cmyk

## संपादकीय

### मालेगावच्या तपासावर संशय!

२०१७ मध्ये साध्वी प्रज्ञा यांना निर्दोष करण्याचा प्रयत्न झाला आणि तीच व्यक्ती २०१९ मध्ये भाजपा खासदार झाली. दहशतवादाविरोधात सरकार कठोर असल्याचा दावा करणा-या भाजपाने एका दहशतवादी आरोपीला खासदार केले, हे जग विसरणार नाही. या निकालानंतर साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर भावूक झाल्या. त्या म्हणाल्या, मला जेव्हा तपास यंत्रणांनी बोलावले तेव्हा मी सहकार्याच्या भावनेने गेले होते. पण पोलिसांनी मला कोठडीत ठेवून अपमान केला, मारहाण केली. संपूर्ण आयुष्य संन्यासी म्हणून जगले, पण समाजाने मला वाईट नजरेने पाहिले. माझ्यावरून भगव्या रंगाला कलंकित केले. आज १७ वर्षांनंतर पहिल्यांदा मी आनंदी आहे.


दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड - महाराष्ट्र | वर्ष-५ | अंक-९९ | रविवार, दि.३ ऑगस्ट २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये


## बलात्कारी प्रज्वल रेवण्णाला जन्मठेप

बंगळुरू : कर्नाटकच्या बंगळुरू येथील जनता दल सेक्युलर पक्षाचे माजी खासदार आणि माजी पंतप्रधान एचडी देवेगौडा यांचे नातू, केंद्रीय मंत्री कुमारस्वामी यांचे चिरंजीव प्रज्वल रेवण्णा यांना न्यायालयाने जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. फार्म हाऊसमध्ये काम करणाऱ्या महिलेवरील बलात्कारप्रकरणी प्रज्वल रेवण्णावर विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

# पीएम किसानचे पैसे ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग


## पंतप्रधान नरेंद्र मोदींनी २० व्या हप्त्यापोटी दिले २० हजार ५०० कोटी



वाराणवी । प्रतिनिधी

**पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आलेली आहे. शेतकऱ्यांना २००० रुपये याद्वारे दिले जातात. या हप्त्यापोटी ९.७ कोटी शेतकऱ्यांच्या बँक खात्यावर २० हजार ५०० कोटी रुपये वर्ग केले आहेत.**

पंतप्रधान किसान सन्मान निधी योजनेच्या २० व्या हप्त्याचे २००० रुपये शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आले आहेत. उत्तर प्रदेशातील वाराणसीच्या बनौली गावातून ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करणात आली. २० व्या हप्त्याच्या माध्यमातून ९.७ कोटी शेतकऱ्यांना २००० रुपये देण्यात आले. या कार्यक्रमाला पंतप्रधान नरेंद्र मोदी, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते. पीएम किसान सन्मान निधीच्या २० व्या हप्त्याची रक्कम ९ कोटी ७० लाख ३३ हजार ५०२ शेतकऱ्यांना प्रत्येकी २००० रुपये देण्यात आले. केंद्र सरकारच्या कृषी आणि शेतकरी कल्याण मंत्रालयाच्या वतीने ही रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली. केंद्र सरकारने २० व्या हप्त्याद्वारे २० हजार ५०० कोटी रुपयांची रक्कम शेतकऱ्यांना देण्यात आली. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या टर्ममध्ये पीएम किसान सन्मान निधी योजना सुरु करण्यात आली होती. या योजनेचा सुरुवात फेब्रुवारी २०१९ मध्ये करण्यात आली होती. तेव्हापासून आतापर्यंत शेतकऱ्यांना २० हप्त्यांची रक्कम मिळाली आहे. आज उत्तर प्रदेशातील वाराणसीमधील बनौली गावातून २० व्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात पाठवण्यात आली. आज शेतकऱ्यांच्या खात्यात २० व्या हप्त्याचे २००० रुपये जमा करण्यात आले असून यापूर्वी १९ व्या हप्त्याची रक्कम ▶▶ पान २ वर



## थोडक्यात...

### शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मुंडण आंदोलन

लातूर: शेतकऱ्यांच्या कर्जमाफीची मागणी करीत पायी चालत मुंबईकडे निघालेल्या सहदेव होणाळे या शेतकऱ्याने लातूर जिल्ह्यातल्या धानोरा इथं मुंडण आणि दंडवत आंदोलन केले आहे. कर्जमाफी बाबत सरकारने निर्णय न घेतल्याने त्यांनी स्वतःच्या शेतात मुंडण आंदोलन केले आहे.

### सोन्या-चांदीच्या दरात पुन्हा मोठी वाढ

पुणे-सराफा बाजारात सोन्या, चांदीच्या दरात पुन्हा एकदा मोठी वाढ झाली आहे, सोन्याच्या दरात तब्बल १ हजार ६०० रुपयांची तर चांदीच्या दरात एक हजार रुपयांची वाढ झाली आहे, सोन्या-चांदीच्या किंमती वाढल्यामुळे मागणी घटली आहे.

### नुसती भाषणे होऊन चालत नाही-अजित पवार

पुणे-कष्टकरी गरीब जनतेला कोणत्या कोणत्या योजनेच्या माध्यमातून सहकार्य करता येईल साठी आम्ही प्रयत्नशील आहोत. विकास झाला पाहिजे नुसती भाषणे होऊन चालत नाही. मुंबई गोवा महामार्गावर पुस्तक लिहावे लागेल, असे वक्तव्य अजित पवार यांनी केले आहे.

### पुणे-बीडमध्ये वर्दीची भीती उरली नाही-खा. सुळे

पुणे-पुण्यात आणि बीडमध्ये कायद्याचा धाक उरला नाही. वर्दीची भीती उरली नाही, असा गंभीर आरोप राष्ट्रवादीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी केला. आज जी पुण्यात स्थिती आहे, तशीच बीडमध्ये असल्याचा घणाघात त्यांनी केला.

### अर्बन नलक्ष ठरवून एकादा अटक कराच-राज ठाकरे

पुणे : जनसुरक्षा विधेयकावरून मनसे अध्यक्ष राज ठाकरेंनी थेट सरकारला इशारा दिला असून आंदोलन केल्यास तुम्हाला अर्बन नक्षल ठरवले जाईल. अर्बन नक्षल ठरवून एकदा काय ते अटक कराच, असे आव्हान राज ठाकरेंनी सरकारला दिले आहे.

### तुळजाभवानीची तलवार गहाळ?

तुळजापुर : तुळजाभवानी मंदिरातील शस्त्र पूजनाची तलवार गहाळ झाल्याचा आरोप पुजाऱ्यांनी केला आहे. मंदिर संस्थांच्या खजाना खोलीत ही तलवार होती मात्र ती तलवार गायब झाली असून तलवार मंदिराच्या बाहेर असल्याचा दावा पुजाऱ्यांनी केला आहे. तुळजाभवानीच्या आठ आयुधातील शास्त्राची तत्व आणि शक्ती तलवारीमध्ये काढून तलवार गायब केल्याचा या पुजा-यांचा आरोप आहे.

## आष्टीत हॉटेल कामगाराचा संशयास्पद मृत्यू

### मृतदेह ताब्यात घेण्यास कुटुंबाचा नकार!

आष्टी/म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**मागील एक महिन्यापासून तालुक्यातील एका हॉटेलवर कामगार म्हणून काम करत असलेल्या कामगारांचा शुक्रवारी सकाळी सहा ते सात वाजण्याच्या दरम्यान मृत्यू झाला होता. मृत्यू संशयास्पद असल्याने कुटुंबासह, नातेवाईकांनी मृतदेह ताब्यात घेण्यास नकार दिला असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यासाठी शनिवारी पोलिस अधिक्षक कार्यालयात ठाण मांडून बसले आहेत.**




आष्टी तालुक्यातील खडकत येथील एका हॉटेलवर मागील एक महिन्यापासून जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील धेनटाकळी येथील सिताराम रखमाजी ढवळे (४०) हे कामगार म्हणून कामाला होते. शुक्रवारी सकाळी सहा ते सातच्या दरम्यान त्यांचा हॉटेलवरील वरच्या मजल्यावरून पडून मृत्यू झाल्याचे सांगण्यात आले. मात्र, कुटुंबातील सदस्य व नातेवाईकांनी हा मृत्यू संशयास्पद असून खुनाचा गुन्हा ▶▶ पान २ वर

## संभाजीनगरात बनावट नोटांचा छापखाना पुन्हा एकदा बीड कनेक्शन समोर

बीड । प्रतिनिधी

**मागील काळामध्ये बीडमध्ये ही बनावट नोटाचा चलनात वापर होत होता याप्रकरणी बीड शहर पोलिसांनी क्षीरसागर नामक आरोपीला ताब्यात घेतले होते परंतु मागील दोन दिवसापूर्वी छत्रपती संभाजीनगर येथील वाळूज एमआयडीसी भागामध्ये बनावट नोटाचा छापखाना पोलिसांनी उद्ध्वस्त केला या प्रकरणी याचे धागेदोरे थेट बीड पर्यंत पोहोचले असून बीड मधील दोघांना शुक्रवारी ताब्यात घेण्यात आल्याची माहिती आहे.एक आरोपी शिरूर कासार येथील**



आहे.

मराठवाड्यातील काही भागात अहिल्यानगर आणि पुण्याच्या बाजार भेटीमध्ये बनावट नोटा चलनात आल्याची बाब समोर आल्यानंतर पोलिसांनी याचा शोध सुरू केला आणि संभाजीनगर येथे वाळूज औद्योगिक वसाहत मध्ये सुरू असलेला हा बनावट नोटाचा छापखान्यावर पोलिसांनी छापा मारला यात निखिल शिवाजी गांगर्डे सोमनाथ माणिक शिंदे प्रदीप संजय कापरे शिरूर जिल्हा बीड मंगेश शिरसाट विनोद हार्बर आकाश बनसोडे अनिल पवार यांना ताब्यात ▶▶ पान २ वर

## शेतकरी-कुरेशी समाजासाठी हिंदू मुस्लिमही एकत्र !

### बीडमध्ये सरकारविरोधात संतप्त गर्जना जनावरं सांभाळा, शेतकरी वाचवा!

बीड । प्रतिनिधी

शेतकरी व कुरेशी समाजाच्या समस्या आणि मागण्यांसंदर्भात बीड येथील त्रछ फंक्शन हॉलमध्ये पार पडलेली जाहीर सभा सरकारच्या धोरणांवर जोरदार हल्ला करत संतप्त घोषणा आणि आक्रोशांनी गाजली. रात्री साडे आठच्या सुमारास पार पडलेल्या या बैठकीस शेकडो मुस्लिम बांधव व शेतकरी वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता. उपस्थितांमध्ये आजी-माजी नगराध्यक्ष,



आमदार, समाजसेवक, धर्मगुरू व कायद्याच्या क्षेत्रातील मान्यवरांनी ठाम भूमिका मांडली. ही लढाई ▶▶ पान २ वर

## धारूरमध्ये सरस्वती विद्यालयात शिक्षक आणि लिपीकात फ्री स्टाईल हाणामारी



किल्ले धारूर

धारूर शहरातील सरस्वती विद्यालयामध्ये क्लार्क प्रदीप शेटे व शिक्षक विजय काळे यांच्यामध्ये वाद झाल्याने क्लार्क शेटे यांनी बाहेरून भावकीतले माणसं बोलावून विजय काळे सर यांना बेदम मारहाण केली सर्व प्रकार हा शाळेच्या सीसीटीव्ही कॅमेरे मध्ये कैद झालेला आहे शाळेमधील विद्यार्थ्यांना घ्यावा लागत आहेत हाणामारीचे धडे यावर शाळेचे मुख्याध्यापक व शिक्षण विभाग काय कारवाई करणार याकडे पालक वर्गांचे लक्ष लागलेले आहे या प्रकारामुळे विद्यार्थ्यांच्या पालकांमध्ये नाराजीचा सूर दिसून येत आहे शिक्षण विभागाने देखील याकडे लक्ष देण्याची गरज शाळेतील शिक्षकांची बग्याची भूमिका हा प्रकार होत असताना सर्व शिक्षक नुसते पिक्चर पाहिल्यासारखे पाहत होते मुख्याध्यापक डोंगरे सर सोडता एकही शिक्षक भांडण सोडवण्यासाठी समोर आला नाही हा सर्व प्रकार विद्यार्थ्यांच्या समोर होत होता व शिक्षकांच्या समोर होत होता.

## कृषि खात्याच्या अदलाबदलीवर पंकजा मुंडेंचे मौन

नाशिक । प्रतिनिधी

विधिमंडळात रमी खेळल्यावरुन वादात सापडलेल्या ॲड. माणिकराव कोकाटे यांच्याकडील कृषी खाते काढून घेण्यात आले आहे. तर यापूर्वीचे कृषीमंत्री भ्रष्टाचाराच्या आरोपांवरुन वादाच्या भोव-यात सापडल्यावरुन राज्याच्या पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री पंकजा मुंडे यांना पत्रकारांनी प्रश्न केला असता, त्यांनी यासंदर्भात बोलणं टाळलं. 'मी फक्त माझ्या खात्याकडेच बघते' अशी प्रतिक्रिया त्यांनी दिली.

क्रेडाई नाशिक मेट्रोतर्फे आयोजित 'एअरोनॉमिक्स २०२५' या मोहिमेच्या उद्घाटनासाठी पंकजा मुंडे नाशिकमध्ये आल्या होत्या. यावेळी त्यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी पत्रकारांनी मंत्री पंकजा मुंडे यांना कृषी खात्यात झाल्याल्या ▶▶ पान २ वर

## भाजपला सत्तेतून घालवण्यासाठी प्रयत्न करणार

### रासप कोणाबरोबरही युती करणार नाही-जानकर



पुणे । प्रतिनिधी

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत राष्ट्रीय समाज पक्ष (रासप) कोणत्याही पक्षाबरोबर युती करणार नाही, असे स्पष्ट करत पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांनी कार्यकर्त्यांना पक्षाचे संघटन वाढवण्याचे आवाहन केले आहे. तसेच भाजपला सत्तेतून घालवण्यासाठी यापुढे प्रयत्न करणार ▶▶ पान २ वर

## सोमनाथ सुर्यवंशी प्रकरणी गुन्हा दाखल

परभणी । प्रतिनिधी

सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू प्रकरणांमध्ये, आता सुप्रीम कोर्टाने दिलेल्या आदेशानंतर, परभणीच्या नवा मोंढा पोलिस ठाण्यामध्ये गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. मयत सोमनाथ सूर्यवंशी यांच्या आई, विजयाबाई सूर्यवंशी यांच्या अर्जावरून हे गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. नवा मोंढा पोलीस ठाण्यामध्ये अज्ञाताविरोधात हे गुन्हे दाखल करण्यात आले असून सुप्रीम कोर्टाने दिलेल्या निर्देशानुसार, गुन्हा दाखल करण्यात आल्याची माहिती देण्यात आली आहे.

## पेट्रोल-डिझेलचे दर भडकण्याची शक्यता




नवी दिल्ली । वृतसंस्था

**रशिया आणि अमेरिका यांच्यातील तणाव कायम असल्याने क्रूड ऑईलच्या दरात वाढ होण्याची शक्यता आहे. त्यामुळे भारतातही पेट्रोल आणि डिझेलचे दर भडकण्याची शक्यता आहे.**

रशिया आणि अमेरिका यांच्यातील तणाव वाढत असल्याचे चित्र आहे. दोन्ही देशांमधील तणाव वाढल्याने तेलाच्या जागतिक पुरवठ्यात ▶▶ पान २ वर

## पर्यावरण खात्याकडे निधीची कमतरता-पंकजा मुंडे

### निधी नसल्याने व्यक्त केली खंत; लाडक्या बहिण योजनेचा परिणाम

मुंबई । प्रतिनिधी

**पर्यावरण खात्याकडे निधीची कमतरता असल्याची खंत पर्यावरण मंत्री पंकजा मुंडेंनी व्यक्त केली आहे. सरकारने पर्यावरण खात्याला निधीची व्यवस्था करावी, अशी मागणी देखील त्यांनी केली आहे. लाडकी बहिण योजनेचा इतर खात्यावर मोठा परिणाम होत असल्याचे पुन्हा एकदा दिसून येत आहे.**



लाडकी बहिण योजनेने जरी महायुतीला सत्तेत बसवले असले तरी आता या योजनेमुळे सरकारची दमछाम कशी होत आहे, हे उघड होत आहे. अगोदर सामाजिक न्याय मंत्री संजय सिरसाट, त्यानंतर इतर मंत्र्यांनी सुध्दा आपल्या खात्याला निधी नसल्याचे सांगून उघडपणे नाराजी व्यक्त केली होती. आता पर्यावरण व दुग्धविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०२ ऑगस्ट २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.०० क्विंटल | २,७६८ | २,७६८ | २,७६८ |
| ज्वारी/हायब्रिड : ९.०० क्विंटल | २,३१० | २,७०० | २,५२८ |
| मका/लोकल:१.५० क्विंटल | २,१०४ | २,१०४ | २,१०४ |
| तूर : १.०० क्विंटल | ५,७०० | ५,९०१ | ५,८०० |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ९.५० क्विंटल | २,५५१ | २,९११ | २,६८५ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ४,६०० | ४,६०० | ४,६०० |
| हरभरा: ९.०० क्विंटल | ५,८१० | ६,१०० | ५,९५५ |

# मध्यान्ह भोजनाची चव आधी मुख्याध्यापक घेणार!



बीड । प्रतिनिधी

**प्राथमिक शाळांमध्ये प्रधानमंत्री पोषण शक्ती निर्माण योजनेंतर्गत मिळणाऱ्या मध्यान्ह भोजनातून वारंवार घडणा-या विषबाधेच्या घटनांमुळे चिंतेचा विषय निर्माण झाला आहे. ही परिस्थिती लक्षात घेता, शालेय शिक्षण विभागाने अन्न विषबाधा रोखण्यासाठी काटेकोर 'मानक कार्यपद्धती' (एसओपी) लागू केली आहे. ती राज्यभरातील इयत्ता पहिली ते आठवीच्या शाळांमध्ये लागू असणार अगोदर चव मुख्याध्यापकाने घ्यायची आणि नंतरच विध्यार्थ्यांना द्यायचे असे बंधन करण्यात आले आहे.**

केंद्र व राज्य शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार शाळांमधून पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्यांना दररोज ४५० कॅलरी आणि १२ ग्रॅम प्रथिने असलेला आहार, तर सहावी ते आठवीच्या विद्यार्थ्यांना ७०० कॅलरी आणि २० ग्रॅम प्रथिनेयुक्त आहार दिला जातो. मात्र, काही ठिकाणी अन्न दूषित होऊन विद्यार्थ्यांना विषबाधा झाल्याच्या घटना समोर आल्या आहेत. त्यासाठी आता शासनाने ही एसओपी सक्तीने लागू करण्याचे आदेश दिले आहेत.या एसओपीनुसार शाळांमध्ये जेवण तयार करताना स्वच्छतेला सर्वाधिक प्राधान्य दिले गेले आहे. बाहेरील पदार्थ वापरणे, कालबा अन्नसाहित्य, साचलेले धान्य, उघड्यावर अन्न बनवणे यासारख्या गोष्टींना पूर्ण मनाई करण्यात आली आहे. स्वयंपाकघरात झुरळ, उंदीर, मांजर यांचा वावर असू नये यासाठीही विशेष दक्षता घेण्याचे निर्देश ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# मालेगावच्या तपासावर संशय!

२०१७ मध्ये साध्वी प्रज्ञा यांना निर्दोष करण्याचा प्रयत्न झाला आणि तीच व्यक्ती २०१९ मध्ये भाजपा खासदार झाली. दहशतवादाविरोधात सरकार कठोर असल्याचा दावा करणा–या भाजपाने एका दहशतवादी आरोपीला खासदार केले, हे जग विसरणार नाही. या निकालानंतर साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर भावूक झाल्या. त्या म्हणाल्या, मला जेव्हा तपास यंत्रणांनी बोलावले तेव्हा मी सहकार्याच्या भावनेने गेले होते. पण पोलिसांनी मला कोठडीत ठेवून अपमान केला, मारहाण केली. संपूर्ण आयुष्य संन्यासी म्हणून जगले, पण समाजाने मला वाईट नजरेने पाहिले. माझ्यावरून भगव्या रंगाला कलंकित केले. आज १७ वर्षांनंतर पहिल्यांदा मी आनंदी आहे. कर्नल प्रसाद पुरोहित म्हणाले, १७ वर्षे शिक्षा भोगली. जामिनावर असूनही त्रास सहन करावा लागला. अधिकारांचा दुरुपयोग करून आमच्यावर अन्याय झाला. मला यंत्रणांना दोषी धरायचे नाही, सत्तेचा गैरवापर झाला. संस्था वाईट नसतात, पण त्यातील काही लोक कायद्याचा गैरवापर करतात. देशाची पायाभूत रचना मजबूत हवी.

मालेगाव येथे २९ सप्टेंबर २००८ रोजी बॉम्बस्फोट झाला. या स्फोटात ६ जणांचा मृत्यू झाला. महत्त्वाचे म्हणजे 'हिंदू आतंकवाद' असा नवा शब्द यात निर्माण झाला. कारण अभिनव भारत, बडे लष्करी अधिकारी आणि साध्वी ठाकूर यात आरोपी होते. या अत्यंत महत्त्वाच्या खटल्यात विशेष न्यायालयाने सर्व सात आरोपींना निर्दोष ठरवले. इतकेच नव्हे तर एटीएस आणि एनआयए सारख्या भक्कम यंत्रणांनी तपास करूनही एकाही आरोपीच्या विरोधात त्यांना ठोस पुरावा देता आला नाही. मुंबई साखळी स्फोटातील सर्व आरोपी नुकतेच या कारणाने निर्दोष सुटल्यानंतर पुन्हा एकदा तसाच निर्णय झाल्याने तपास यंत्रणांवरच संशय निर्माण झाला आहे. मालेगाव खटल्याचा निकाल एनआयए विशेष न्यायालयाने १७ वर्षांच्या प्रदीर्घ कालावधीनंतर गुरुवारी दिला. यात सर्व ७ आरोपींना पुराव्याअभावी निर्दोष घोषित केले. या थक्क करणा–या निकालामुळे स्फोट नक्की कोणी केला, असा प्रश्न निर्माण झाला आहे. या निकालाच्या विरोधात सरकार अपील करणार का हा प्रश्नही विचारला जात आहे. न्यायालयाने आरोपींना निर्दोष ठरवले, पण ६ मृतांच्या नातेवाईकांना प्रत्येकी २ लाख रुपये आणि जखमींना प्रत्येकी ५० हजार रुपये मदत देण्याचा सरकारला आदेश दिला. हा निकाल देताना एनआयए न्यायालयाचे न्यायाधीश ए. के. लाहोटी यांनी आरोपी साध्वी प्रज्ञासिंह ठाकूर, ले. कर्नल प्रसाद पुरोहित, मेजर रमेश उपाध्याय (निवृत्त), अजय राहिरकर, सुधाकर द्विवेदी, सुधाकर चतुर्वेदी आणि समीर कुलकर्णी यांची पुराव्याअभावी सुटका केली. यावेळी न्यायालयाने नमूद केले की, सरकारी पक्ष कोणताही ठोस आणि विश्वासार्ह पुरावा सादर करण्यात अपयशी ठरले. केवळ नैतिक आधारावर शिक्षा करता येत नाही. त्यामुळे सर्व आरोपींना संशयाचा फायदा दिला जात आहे. या निर्णयावर पीडितांचे वकील शाहीद नदीम यांनी नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले की, आरोपींची सुटका झाली असली तरी आम्ही उच्च न्यायालयात जाणार आहोत. पुरावे नाहीत म्हणून ते सुटले, तपास यंत्रणा सबळ पुरावे देऊ शकली नाही. मालेगावमध्ये बॉम्बस्फोट झाला होता हे सिद्ध झाले. कारण यापूर्वी आरोपी मालेगावमध्ये बॉम्बस्फोटच झाला नाही असे म्हणत होते. पण न्यायालयाने बॉम्बस्फोट झाला हे स्पष्ट केले. एमआयएमचे प्रमुख ओवेसी म्हणाले की, या स्फोटात ६ नमाजी ठार झाले आणि १०० हून अधिक जखमी झाले. त्यांचा धर्म लक्षात घेऊनच ते लक्ष्य ठरले होते. मुंबई रेल्वे बॉम्बस्फोटातील आरोपींच्या निर्दोष सुटकेवर स्थगिती मागणारे मोदी आणि फडणवीस या निकालाविरोधात अपील करतील का? एनआयए किंवा एटीएसच्या अधिका–यांना त्यांच्या दोषपूर्ण तपासासाठी जबाबदार धरले जाईल का? २०१६ मध्ये सरकारी वकील रोहिणी सालियन यांनी सांगितले होते की, एनआयएने आरोपींबद्दल सौम्य भूमिका घेण्यास सांगितले होते. न्यायालयाने सामान्य जनतेचा व्यवस्थेवरील विश्वास पुन्हा निर्माण केला. सरसंघचालक मोहन भागवत म्हणाले, या निकालातून मालेगाव स्फोटाशी संघाचा संबंध नसल्याचे स्पष्ट झाले. मुख्यमंत्री फडणवीस यांनी 'आतंकवाद भगवा न कभी था, ना था, ना कभी रहेगा' अशी एक्स पोस्ट केली. राष्ट्रवादी व तत्कालीन काँग्रेस सरकारने भगवा दहशतवाद आणि हिंदू दहशतवाद असे चुकीचे चित्र निर्माण करण्याचा कट रचला होता. आज तो कट उघडा झाला. फक्त विशिष्ट धर्माच्या मतपेटीसाठी काँग्रेसने हा प्रपंच केला आणि सर्व हिंदूंना दहशतवादी ठरवण्याचा प्रयत्न केला. या प्रकरणी काँग्रेसने देशाची माफी मागावी. काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ म्हणाले, पहिली गोष्ट म्हणजे बॉम्बस्फोट झाला, त्यात लोकांचा मृत्यू झाला. जर बॉम्बस्फोट झाला तर त्यातील आरोपी गेले कुठे हा स्वाभाविक प्रश्न अनुत्तरित आहे. जे दोषी असतील त्यांना पकडले पाहिजे, त्यांना शिक्षा होणे या दृष्टीने सरकार पुढे काय करणार हा प्रश्न आहे. शहीद हेमंत करकरे यांनी या प्रकरणाचे धागेदोरे शोधले होते, त्याचे पुढे काय झाले? स्फोटातील आरोपींना शोधले पाहिजे, ही सरकारची जबाबदारी आहे. शहीद पोलिस अधिकारी हेमंत करकरे यांच्या मार्गदर्शनात एटीएसने मालेगाव बॉम्बस्फोट प्रकरणात दाखल केलेल्या आरोपपत्रात नमूद केलेले पुरावे शास्त्रीय आणि भक्कम होते असा दावा माजी पोलिस अधिकारी आणि 'हू किल्ड करकरे' पुस्तकाचे लेखक शमशुद्दीन मुश्रीफ यांनी केला. ते म्हणाले, करकरे यांच्या पुराव्यावरून कथित आरोपींचा कट आमच्या दृष्टीने सिद्ध होतो. मात्र, न्यायालयाने याकडे कोणत्या दृष्टीने पाहिले याची कल्पना नाही. न्यायालयाने निकालपत्रात म्हटले आहे की, बॉम्ब ज्या मोटारसायकलला लावला होता ती मोटारसायकल प्रज्ञासिंह ठाकूर यांची असल्याचे पुरावे नाहीत. फॉरेन्सिक अहवालात मोटारसायकल चेसिसचा संपूर्ण क्रमांक सापडलेला नाही. साध्वी प्रज्ञा यांनी दोन वर्षांपूर्वीच संन्यास घेतला होता आणि भौतिक वस्तूंपासून निवृत्त झाल्या होत्या. कर्नल पुरोहित यांनी काश्मीरमधून आरडीएक्स आणले किंवा बॉम्ब तयार केला याबाबत कोणताही ठोस पुरावा नाही. आरोपींच्या मोबाईलमध्ये कोणतेही पुरावे आढळले नाहीत.

## कचरूलाल समदरीया यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

**श्री जैन श्वेतांबर तेरापंथ धर्म संघाचे वरीष्ठ सुश्रावक ज्यांना आचार्य श्री महाप्रज्ञजी द्वारे श्रद्धानिष्ठ हे अलंकरण देण्यात आले होते. असे श्रीमान कचरूलालजी बस्तीमलजी समदरीया यांचे आज दि.०२/०८/२०२५ वार शनिवार दू ०१:३ मि. वाजता वृद्धापकाळाने वयाच्या ८८ व्या वर्षी बीड येथील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले आहे. त्यांच्या मागे त्यांच्या दोन भावांचा, पाच मुल, एक कन्या, नातु, पंतु असा समृद्ध व विशाल परीवार आहे.**



बीड मधील कापडाच्या व्यवसायातील शित्तल ग्रुपचे हे सर्वेसर्वा होते. यांच्या पार्थिवावर आज दि.०३/०८/२०२५ वार रविवार सकाळी १०:१५ मिनीटाने अंत्यसंस्कार, अमरधाम, मोंढा रोड, बीड येथे होणार आहे.

## १३ मोटरसायकल जप्त; ३ आरोपीवर गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

**परतुर शहरात व जिल्हयात मोटारसायकल चोरी करणा–या आरोपीतांना अटक करण्यात आली. सदरील आरोपीकडून ९,४०,०००/– रुपयांच्या (१३) महागडया मोटारसायकली जप्त करण्यात आल्या.**



परतुर शहरातील व तालुक्यातील मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल यांनी वेळोवेळी सुचना देऊन आदेशीत केलेले होते. त्यावरुन पोलीस निरीक्षक श्री.एस.बी. भागवत यांनी पोलीस ठाणे परतुर येथील अधिकारी अंमलदार यांचे एक मोटारसायकल चोरीचे गुन्हे उघडकीस आणण्यासाठी एक तपास पथक नेमलेले आहे. पथकातील अधिकारी अंमलदार हे परतुर शहरातील व तालुक्यातील चोरीस गेलेल्या मोटारसायकलचे तांत्रीक विश्लेषण करीत होते. ०१ ऑगस्ट रोजी पोलीस निरीक्षक यांना माहिती मिळाली की, पोलीस ठाणे परतूर येथे गुरनं ३८२/२०२५ कलम ३०३(२) प्रमाणे दाखल असलेल्या गुन्हयाती मोटारसायकल ही परतुर–वाटुर रोडवरील बालाजीनगर येथील हॉटेल मोक्ष समोर काही इसमांनी चोरुन नेलेली आहे. पथकातील अधिकारी अंमलदार यांनी मौजे लिंगसा ता. परतुर येथुन विष्णू दादाराव माने वय २० वर्ष रा.लिंगसा ता. परतुर यास ताब्यात घेऊन विचारपुस केली असता त्यांनी त्यांचा साथीदार वैभव ज्ञानेश्वर धरपडे वय २१ वर्ष रा. सादोळा ता. परतुर , सुभाष उर्फ राजेश प्रभाकर जाधव वय २५ वर्ष रा.लिंगसा ता. परतुर याच्यासह केल्याचे सांगितले. सदर आरोपीतांकडुन चोरलेल्या कंपनीची (०७), कंपनीची (०३), (०१), + (०१) अशा एकुण (१३) मोटारसायकली किंमती ९,४०,००० रुपयांच्या जप्त केलेल्या आहेत. सदर आरोपीने मोटारसायकली जालना, बीड, छत्रपती संभाजीगनर या जिल्हयातुन विविध ठिकाणावरुन चोरुन आणल्याचे सांगितल्याने अजुन गुन्हे उघडकीस येणार आहेत.



## कर्जत येथे अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

अंबड । प्रतिनिधी

**कर्जत ता. अंबड येथील साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले.**

यावेळी अ‍ॅड.श्रीराम हुसे, डॉ.राहुल डोंगरे, सुनील काळुंखे, किशोर काळुंखे, सरपंच संजय काळुंखे, उपसरपंच अण्णासाहेब डोंगरे, रामेश्वर पवार, पांडुरंग वाघ ,दयानंद काळुंखे ,कृष्णा वीर सह आदींची उपस्थिती होती.मान्यवरांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांचे संयुक्त महाराष्ट्र लढा, वंचित,शोषित, उपेक्षित घटकांना साहित्यात स्थान देऊन दिलेले योगदान, आणि कार्यास उजाळा दिला.

## जि.प.परिसरात प्लास्टिक बंदी–सीईओ मीन्नु

### उल्लंघन केल्यास १० हजाराचा दंड

जालना । प्रतिनिधी

**जिल्हा परिषद स्वच्छ व सुंदर राहावी तसेच पर्यावरणाचे संवर्धन व्हावे यासाठी जिल्हा परिषद परिसरात प्लास्टिक च्या वापरावर पूर्णपणे बंदी घालण्यात आली असून या नियमाचे उल्लंघन केल्यास रु १० हजार पर्यंत दंड करण्यात येणार असल्याचे आदेश जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मीन्नु पी.एम यांनी कार्यालयीन प्रमुखांना दिले आहेत.**



मीन्नु यांनी सीईओ चा पदभार घेतल्यापासून जिल्हा परिषदेच्या परिसरातील स्वच्छतेवर विशेष भर दिला आहे.राज्यात महाराष्ट्र प्लास्टिक आणि थर्माकोल प्रोडक्ट (निर्मिती ,वापर ,विक्री ,वाहतूक ,हाताळणी व साठवणूक च्या कायद्यान्वये सिंगल युज प्लास्टिक आणि थर्माकोल च्या वापरावर बंदी घातली आहे. ५० मायक्रोन पेक्षा कमी जाडीच्या प्लास्टिक च्या वापरावर बंदी आहे या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी सीईओ मिन्नु यांनी विशेष योजना आखली असून , कार्यालयात , कार्यालयीन कार्यक्रमात प्लास्टिक च्या वापरावर निर्बंध घातले आहेत . यात प्लास्टिकच्या बँग सह , पाणी बॉटल, चमचा , ग्लास , थर्माकोल , याचा समवेश आहे.कार्यालयीन कर्मचारी यांनी दिनांक १० ऑगस्ट पर्यंत आपापल्या ठिकाणी पर्यायी व्यवस्था करावी , त्यानंतर जिल्हा परिसरात झिरो प्लास्टिक अंतर्गत हा दंड आकाराला जाणार असल्याचे पत्रकात म्हटले आहे.तसेच कार्यालयीन परिसरातील हॉटेल धारकांनाही नियमावली लागू राहणार असून याची देखरेख करण्याची जबाबदारी कर्मचारी , शिपाई , सुरक्षा गार्ड यांची राहणार आहे.जिल्ह्यातील प्रत्येक तालुका व गाव पातळीवर या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येणार असून तालुकास्तरावर श्रमदान व सिंगल युज प्लास्टिक वापरावर बंदी घालण्यात येणार असून स्वच्छ भारत मिशन कार्यक्रम अंतर्गत याचे नियोजन व सनियंत्रण केले जाणारआहे. गावागावात संकलित होणारे प्लास्टिक तालुकास्तरावरील प्लास्टिक संकलन केंद्रावर एकत्रीकरण करून त्यावर प्रक्रिया केली जाणार आहे. १५ ऑगस्ट पासून या निर्णयाची सक्त अंमलबजावणी करण्यात येणार असून त्या अनुषंगाने विभाग प्रमुख व गटविकास अधिकारी यांना आदेशित केले असून जनतेने या निर्णयात सहभागी होवून मी प्लास्टिक वापरणार नाही व इतरानाही वापरापासून परावृत्त करेल असा निर्धार करावा असे आवाहन हि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु यांनी केले आहे.

## माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ युवासेनाकडून निषेध

जालना । प्रतिनिधी

माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांच्या वक्तव्याच्या निषेधार्थ युवासेनेनं निषेध आंदोलन केले . युवा सेनेचे राज्यसचिव अभिमन्यू खोतकर शिवसेना शहरप्रमुख विष्णू पाचफुले युवा सेनेचे जिल्हाप्रमुख अमोल ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात हे आंदोलन करण्यात आलं. राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांनी भगवा दहशतवाद नाही, तर हिंदू दहशतवाद/ सनातनी दहशतवाद म्हणा असं वक्तव्य केलं होतं. चव्हाण यांच्या त्या वक्तव्याच्या निषेधार्थ जालन्यात आज शिवसेना युवा सेनेच्या वतीने निषेध आंदोलन करण्यात आलं. यावेळी जोरदार घोषणाबाजी करत चव्हाण यांच्या वक्तव्याचा निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी जोरदार घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला होता. या आंदोलनात मेघराज भैया चौधरी युवा सेनेचे तालुकाप्रमुख गणेश मोहिते युवा सेना जिल्हाप्रमुख शैलेश घुमारे युवा सेना शहर जिल्हा समन्वयक शुभम टेकाळे युवा सेना जिल्हा समन्वयक सागर पाटील देवेंद्र बुंदुले युवा सेना तालुकाप्रमुख नागेश डवले अजय कदम राजरत्न रत्नपारखे आकाश जगताप मेघराज चौधरी सुशील भावसार लखन कणसे महिंद्र मंचवार गोविंद सोनवणे नीरज मंत्री दीपक हवाले विकी वाघमारे किशोर शिंदे कपिल गोंठे भूषण सांबरे मनोज धानोरे सागर पाटील दीपक वैद्य दिलीप वाडेकर बाळासाहेब जाधव विशाल इंगळे रवी ढगे राहुल गवारे राम सिंगारे माधव वाघ भगवान आंबोरे धनंजय बावणे संतोषराव वाघ ज्ञानेश्वर ढवळे अंजू कोणते सिताराम तिडके कुणाल जाधव दिनेश भगत कांतीलाल वाहुकळ किरण शिरसाट बाळू भाऊ पाचरणे शिवसेना युवा सेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.




## पान १ वरून...

### पीएम किसानचे पैसे ९.७ कोटी

२४ फेब्रुवारी २०२५ रोजी बिहारमधील कार्यक्रमातून शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली होती. तर, १८ व्या हप्त्याची रक्कम महाराष्ट्रातील वाशिम येथील कार्यक्रमातून शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली होती. पीएम किसानच्या २० व्या हप्त्याची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात वर्ग करण्यात आली आहे. म्हणजेच पहिल्या हप्त्यापासून जे पात्र शेतकरी आहेत. त्यांना २० हप्त्यांचे मिळून ४०००० हजार रुपये मिळाले आहेत. पीएम किसान सन्मान निधी योजनेच्या लाभार्थ्यांना एका वर्षात ६००० रुपये दिले जातात. २ हजार रुपयांच्या तीन समान हप्त्यांमध्ये शेतकऱ्यांच्या खात्यात रक्कम वर्ग केली जाते.

-----------

### संभाजीनगरात बनावट नोटांचा छापखाना

घेतले मात्र यातील मुख्य सूत्रधार अंबादास ससाने तालुका शेगाव जिल्हा अहिल्यानगर हा प्रसार पोलिसांनी केलेल्या या कारवाईत शिरूर तालुक्यातील एक आरोपी निष्पन्न झाला याच पथकाने २८ जुलै रोजी भेटला प्रदीप कापरेला घरातून उचलले त्याच्या चौकशीत मंगेश विनोद यांची नावे निष्पन्न झाली यानंतर मंगेश आणि विनोद या दोघांनाही तिसगाव मधून ताब्यात घेतले गेले ३१ जुलैला तिसगाव शिवारामध्ये आकाशवाणी या दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले गेले विशेष म्हणजे या बनावट नोटांची धागेद्वारे थेट पुढील पर्यंत आल्याचे यातून निष्पन्न झाले आहेत त्यामुळे बीड जिल्ह्यातही अशा मनावर नोटा चलनामध्ये आल्या असाव्यात असा संशय आहे.

---------------

### आष्टीत हॉटेल कामगारांचा

दाखल करावा. तोपर्यंत मृतदेह ताब्यात घेणार नसल्याची भूमिका घेतल्याने तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे. कुटुंबातील सदस्य व नातेवाईक बीड येथे पोलिस अधीक्षकांकडे गेले असून खुनाचा गुन्हा दाखल करण्यात यावा म्हणून ठाण मांडून बसले आहेत घटनास्थळी आष्टीचे पोलीस निरीक्षक शरद भुतेकर, पोलिस हवालदार प्रवीण क्षीरसागर, हनुमान घाडगे, भरत गुजर, बिभीषण गुजर, चालक भाग्यवंत यांनी भेट देऊन पंचनामा केला आहे. आष्टी पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून मृतदेहावर आष्टी ग्रामीण रूग्णालयात शवविच्छेदन करण्यात आले असून मृतदेह ताब्यात न घेतल्याने आष्टी येथील शवगृहात ठेवण्यात आले आहे.

-----------

### कृषि खात्याच्या अदलाबदलीवर

अदलाबदलीविषयी विचारणा केली. तसेच कृषीमंत्री सातत्याने वादात सापडत असल्याचे विचारले असता, असे विषय मी मांडत नाही असं त्या म्हणाल्या. तसेच मंत्री असल्यामुळे कुणी अडचणीत सापडतं असं मला वाटत नाही. त्यामुळे असे म्हणणे योग्य होणार नाही. मी त्याकडे बघतच नाही. मी फक्त माझ्या खात्याकडेच बघते असं उत्तर देत त्यांनी याविषयावर अधिक बोलणं टाळलं. पंकजा मुंडे म्हणाल्या कुंभमेळ्याच्या निमित्ताने मला वेळोवेळी नाशिकमध्ये यावे लागणार आहे. गोदावरी नदीचे प्रदुषण रोखण्यासाठी मी प्रयत्न करणार आहे. त्यात मी स्वत:लक्ष घालणार आहे. राज्यातील नद्यांमध्ये सांडपाणी विनापरवाना सोडलं जातं. त्यामुळे नद्या प्रदूषित झाल्या आहेत. भावी पिढ्यांच्या दृष्टीने हे गंभीर संकट आहे. या संकटाला रोखण्यासाठी प्रत्यकाने प्रयत्न करणे गरजेचे आहे.

-----------

### शेतकरी–कुरेशी समाजासाठी

फक्त धर्माची नाही, तर शेतकऱ्याच्या अस्तित्वाची आणि लोकशाहीच्या रक्षणाची आहे. विविध समाज एकत्र येऊन शांततामय, संविधानिक लढ्याच्या माध्यमातून सरकारसमोर आपली मागणी मांडत आहेत. बीडमध्ये उसळलेला हा आवाज आता राज्यभर पोहोचण्याची शक्यता आहे. संजय शिंदे सर यांनी स्पष्टपणे सांगितले की, शेतकऱ्याच्या गोठ्यातून जनावरे चोरी जातात आणि गोरक्षक बनलेले व्यापारी उलट शेतकऱ्यांना त्रास देतात. हे गोरक्षक पोलीस संरक्षणात वावरतात. गोरक्षकाची डाल वापरून शेतकरी व चहुजन समाजाला टार्गेट केलं जातं.अजिक्य चांदणे यांनी आरोप केला की, आरएसएसकडून मुस्लिम समाजावर षडयंत्र रचले जात आहे. बहुजन समाजाला अडकवून सरकार हिंदू–मुस्लिमचं राजकारण करतंय. आमदार–खासदार गप्प बसलेत, आता जनता रस्त्यावर उतरणार,मौलाना अब्दुल कासमी, मुफ्ती आरिफ साहेब, सय्यद सलीम, मोईन मास्टर, जावेद कुरेशी आदी वक्त्यांनी मुस्लिम समाजावर होणाऱ्या अन्यायाचा तीव्र निषेध केला आणि सर्व समाजाने एकत्र येऊन शांततामय आणि कायदेशीर मार्गान लढा देण्याचे आवाहन केले, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शेख हमीद भाई, अकील भाई, हाफेज जमील कुरेशी, खुर्शीद आलम, इरफान भाई व इतर सर्वांनी परिश्रम घेतले, अश्फाक इनामदार,शाहेद भाई,एकबाल मेंबर, सादेख जमा, हफिज इनामदार, शोईब इनामदार, बाबा खान, इलियास मेंबर,शाहेद भाई वगैरे उपस्थित होते.

-----------

### भाजपला सत्तेतून घालवण्यासाठी

असल्याचेही ते म्हणाले. रासपच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांचा मेळावा शुक्रवारी पुण्यात झाला. यावेळी ते बोलत होते. कार्यकर्ता मेळाव्यात बोलताना जानकर म्हणाले, भाजपला सत्तेत आणण्यासाठी आपण मदत केली. आता त्यांना सत्तेतून घालविण्यासाठी प्रयत्न करू. आगामी निवडणुकीसाठी आपण कोणाबरोबरही युती करणार नाही. प्रत्येक प्रभाग, गट–गण या ठिकाणी आपला उमेदवार उभा करायचा आहे. त्यामुळे केवळ समाजमाध्यमांवर फोटो टाकण्यापुरते काम करू नका. महापालिका, नगरपालिका, पंचायत समिती, जिल्हा परिषद निवडणुकीत प्रत्येक बूथवर आपल्या पक्षाचा एक कार्यकर्ता असला पाहिजे, असे नियोजन करा, असे आवाहन त्यांनी केले.

**काम न करणाऱ्याला पदमुक्त करणार**

पुढील दोन महिने पक्षाच्या संघटनात्मक बांधणीवर भर द्या. जो काम करणार नाही, त्याला पदमुक्त केले जाईल, असा इशाराही त्यांनी यावेळी दिला.

-----------

### पर्यावरण खात्याकडे निधीची

सुध्दा आपल्या खात्याला निधी नसल्याचे सांगून खंत व्यक्त केली आहे. तसेच सरकारने पर्यावरण खात्याला निधीची व्यवस्था करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. त्यामुळे लाडकी बहिण योजनेमुळे सरकारमधील मंत्र्यांचीच निधी अभावी दमछाक झाल्याचे दिसून येत आहे.

-----

### पेट्रोल–डिझेलचे दर

अडथळे निर्माण होऊ शकतात. ऑईल मार्केट एक्सपर्टसने एएनआयशी संवाद साधताना म्हटले की येत्या काही महिन्यांमध्ये ब्रेंट क्रूड ऑईलच्या दरात वाढ होऊन ते ८० डॉलर प्रति बॅरल पर्यंत पोहोचू शकतात. भूराजकीय जोखीम वाढल्याने तेलाच्या दरांवर दबाव वाढू शकतो. डोनाल्ड ट्रम्प यांच्या या भूमिकेमुळं रशियाकडून क्रूड ऑईल खरेदी करणाऱ्या देशांसमोर अडचणी निर्माण होऊ शकतात. अमेरिकेकडून लादल्या जाणाऱ्या मोठ्या दंडाचा आणि टॅरिफचा सामना करायचा असा प्रश्न त्यांच्यासमोर आहे. वेस्ट टेक्सास इंटरमिजीएटने सप्टेंबरमध्ये क्रूड ऑईलचा दर ६९.६५ डॉलरवरुन ७३ डॉलरपर्यंत पोहोचू शकतात, असा अंदाज वर्तवला आहे. २०२५ च्या अखेरपर्यंत ७६–७९ डॉलर्स पर्यंत पोहोचू शकतात. क्रूड ऑईलचे दर कमी झाल्यास ते ६५ डॉलर्सपर्यंत येऊ शकतात. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार या घडामोडींमुळे जागतिक तेल बाजारात उलटफेर होऊ शकतात. उत्पादन क्षमता कमी झाल्याने पुरवठ्यावर परिणाम होऊ शकतो. ज्यामुळे २०२६ पर्यंत तेलाच्या किमती वाढू शकतात.

-----------------------

### मध्यान्ह भोजनाची चव आधी

आहेत.शाळेच्या मुख्याध्यापकांनी जेवण बनवल्यानंतर त्याची चव घेऊनच विद्यार्थ्यांना द्यावी, तसेच एका नमुन्याचे जेवण हवाबंद डब्यात २४ तास ठेवावे, असे आदेश आहेत. विद्यार्थ्यांनी जेवण घेतल्यानंतर जर उलटी, मळमळ, पोटदुखी, ताप अशी लक्षणे दिसली, तर तातडीने वैद्यकीय मदत उपलब्ध करून देण्याची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समितीवर सोपवण्यात आली आहे.यासंदर्भात तालुका आणि जिल्हा स्तरावरील शिक्षणाधिकारी, अन्न व औषध प्रशासन, आरोग्य विभाग यांनी यंत्रणा मजबूत करण्याचे आदेश आहेत. प्रत्येक महिन्याला आहाराची प्रयोगशाळा चाचणी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे.स्वयंपाकी आणि मदतनीस यांना दर सहा महिन्यांनी आरोग्य तपासणी आवश्यक असून त्यांच्यासाठी पौष्टिक आहार, स्वच्छता, अन्न सुरक्षा अशा विषयांवर प्रशिक्षण घेतले जाणार आहे. जेवण तयार करताना स्वयंपाकघरातच स्वच्छ भांडी व पाणी वापरणे, हात धुणे, केस बांधणे, नखे कापणे, नेलपॉलिश टाळणे यांसारख्या बाबी कटाक्षाने पाळाव्यात, अशा स्पष्ट सूचनाही देण्यात आल्या आहेत.

## जरांगे पाटील यांच्या वाढदिवसा निमित्त शालेय साहित्याचे वाटप

फुलसांगवी । प्रतिनिधी

**परिसरातील सकल मराठा बांधवांच्या वतीने संघर्ष योद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने फुलसांगवी येथील जि.प. माध्यमिक शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा करण्यात आला आहे.**



संघर्ष योद्धा मनोज जरांगे यांनी मराठा समाजाच्या भल्यासाठी आपले जीवन समर्पित केले असून, समाजाच्या हितासाठी रात्र दिवस एक करून मराठा आरक्षणाचा मुद्दा खंबीर पणे हाताशी धरून राज्य सरकारला धारेवर धरण्याचे काम मोठ्या जोमाने चालवले आहे. मनोज जरांगे या आंदोलनाध्ये फुलसांगवी परिसरातील मराठा समाज सातत्यपूर्ण मोठ्या हिरारीने आजवर सहभागी राहिला आहे. मराठा समाजासाठी आपले जीवन समर्पित करणाऱ्या आपल्या या नेत्याचा वाढदिवस साजरा करण्यासाठी फुलसांगवीतील तरुण एकत्रित येऊन त्यांनी शुक्रवार दि.१ऑगस्ट रोजी फुलसांगवी येथील जि.प.माध्यमिक शाळेतील गोर गरीब विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून स्तुत्य उपक्रमाची भर टाकली आहे. यावेळी जि.प. माध्यमिक शाळेचे मुख्याध्यापक शिवाजी जाधव सर, केशव डोंगरे सर, श्रीमती शीलाताई सोनवणे, बारगजे सर, घुगे सर, वारे सर, पवार सर, सोनवणे सर, उरणकर सर, तळेकर सर शिक्षकांसह मोठ्या संख्येने तरुण मराठा समाज बांधवांची उपस्थिती होती.

राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
रविवार दि. ३ ऑगस्ट २०२५





पाटोदा : साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करतात सभापती किशोर अडागळे पत्रकार सतीश गर्जे डॉक्टर नरेंद्र जवळे वाल्हेकर .

## थोडक्यात....




### डॉ.देशपांडे स्मृतीदिनी बरसल्या सुरांच्या धारा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

संगीताच्या बागेतील ब्रम्हकमळ संगीतसूर्य स्व.डॉ.वसंतराव देशपांडे यांच्या पुण्यस्मृतीदिनी ३१ जुलै रोजी रात्री आयोजित संगीत सभेत सुरांच्या धारा बरसल्या

संगीत सभेची सुरुवात अभियंता आनंद अरूणराव जोशी व प्रा. अतुल अरुणराव जोशी यांनी केली नंतर बी.के.पांडे,डॉ.अतुल कुंबेफळकर,सुचिता देशपांडे,युगंधरा जोशी, आनंद देशपांडे, राजदिप जोशी,राहुल देशपांडे आदींनी गायनाचे सादरीकरण केले.हार्मोनिअमवर बी.के.पांडे यांनी तर तबल्यावर रत्नदीप शिगे यांनी साथसंगत केली प्रारंभी राहूल देशपांडे यांनी प्रास्तविकातून स्मृती समितीच्या उपक्रमाची माहिती दिली. उपस्थितांचे आभार प्रा.अतुल जोशी यांनी मानले.उपस्थितांचे स्वागत करण्यात आले. यावेळी श्रीमती आरती जोशी आदी उपस्थित होते.

### माजलगाव प्रतिष्ठान तर्फे संविधान जागर कार्यक्रमाचे आयोजन

माजलगाव । प्रतिनिधी

येथील माजलगाव विकास प्रतिष्ठान वेगवेगळे सामाजिक उपक्रम राबवत असते. याचाच एक भाग म्हणून ''संविधान जागर – संविधानच का हवे? मनुस्मृती नको, संविधान हवे'' या विषयावर आधारित एक दिवसीय विचार मंथन चर्चासत्र रविवार दिनांक ३ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी १०:३० वाजता सुंदरराव सोळंके महाविद्यालयात आयोजित केले जाणार आहे.या कार्यक्रमाचे आयोजन माजलगाव विकास प्रतिष्ठान आणि महाराष्ट्र स्त्री मुक्ती परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. भारतीय संविधानाचे महत्त्व तसेच त्यातील मूलभूत तत्त्वे यांची जनतेमध्ये जाणीव निर्माण करणे हा या प्रकारच्या कार्यक्रमांचा मुख्य हेतू असून कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ॲड पल्लवी सोळंके उपस्थित राहणार आहेत.या चर्चासत्रात संध्या गोखले, संध्या म्हात्रे, सुजाता गोठोसकर, सुनीता बागल आणि डॉ. सविता शेटे यांसारख्या प्रतिष्ठित व्यक्ती सहभागी होणार आहेत. ''धर्मनिरपेक्ष आणि लोकशाही प्रधान समाज निर्मितीसाठी संविधान हे आपल्या जगण्याचा एक भाग झाले पाहिजे,'' असे आयोजकांनी सांगितले.या कार्यक्रमासाठी नागरिकांकडून मोठ्या प्रमाणावर सहभागाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. संविधानाचे महत्त्व आणि त्याच्या तरतुदींबाबत जनजागृती करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.अधिक माहितीसाठी सखाराम जोशी (९१५८३६३२२३), शोभा डाके (८४०८८ ८०८६४) किंवा डॉ. वरूणराज तौर (८३२९८ ४८२६४) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.



### चंदनवाडी येथे अण्णाभाऊ साठे जयंती व लोकमान्य टिळक यांची पुण्यतिथी साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथून जवळच असलेले चंदनवाडी येथे ग्रामपंचायत कार्यालयात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंतीनिमित्त व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथीनिमित्त १ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी १० वाजता चंदनवाडी ग्रामपंचायत कार्यालय येथे यांच्या प्रतिमेचे पूजन व श्रीफळ फोडून पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी सरपंच ज्ञानेश्वर गित्ते, ग्रामपंचायत अधिकारी वरवटकर,बाळासाहेब गीते, परमेश्वर गीते, धिवार सर, अचला सोनपिर, जनाबाई मोटेराव, नारायण पौळ, राजेभाऊ गीते ,दत्ता गीते व गावकरी मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई पीक पाहणीची ॲपमधून करा नोंदणी : जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

**आपल्या शेतातील पिकांची अचूक नोंद आता थेट मोबाईलमधून करता येते आणि हे शक्य होतं ई पीक पाहणी ४.०.० या नव्या ॲपमुळे . सरकारने आता या ॲपचं अपडेटेड व्हर्जन प्ले स्टोअरवर उपलब्ध केल आहे . खरीप हंगामातील पिकांची नोंदणी १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबर २०२५ दरम्यान केली जाणार आहे . त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या मोबाईलमधील ई पीक पाहणी ॲप अपडेट करून घेणं गरजेचं आहे , अस आवाहन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केल आहे.**

बीडचे अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक यांनी कळवले आहे की हे ॲप वापरायला सोपं असून , तुमच्या शेताचा गट क्रमांक , खाते क्रमांक आणि पिकांची माहिती भरून , शेतातील पिकांचे फोटो अपलोड करायचे असतात . नोंदणी पूर्ण झाल्यावर त्याची प्रत जतन करता येते . ही नोंद तुमच्यासाठी अनेक सरकारी योजनांचा दरवाजा उघडणारी चावी ठरते याविषयी अधिकची माहिती देताना निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी यांनी म्हटले की ई पीक पाहणीचं महत्त्व केवळ नोंदपुरतं मर्यादित नाही . पावसामुळे



नुकसान झाल , तर भरपाई हवी असेल ; बँकेकडून पीक कर्ज हवं असेल ; शासकीय योजना , अनुदान , सवलती मिळवायच्या असतील तर ही नोंदणी अत्यावश्यक असते . याशिवाय, याच माहितीच्या आधारे शासन पीक खरेदीचं नियोजन करतं आणि शेतकऱ्यांना योग्य दर मिळवून देण्यासाठी उपयोग करते .यानिमित्ताने बोलताना बीडच्या उपविभागीय अधिकारी कविता जाधव यांनी बीड गेवराई व शिरूर कासार तालुक्यातील शेतकऱ्यांनी तात्काळ ई पीक पाहणीस सुरुवात करून नोंदणी करावी असे आवाहन केले आहे .या डिजिटल प्रक्रियेमुळे शेतजमिनीचा रेकॉर्डही अद्ययावत राहतो , वाद , गैरसमज टाळता येतात आणि शेतीत पारदर्शकता निर्माण होते . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कळविले आहे की मागील वर्षी शेतकऱ्यांनी जसा प्रतिसाद दिला होता त्याप्रमाणे यावर्षी सुद्धा ईपीक पाहणे करून घ्यावी . जर नोंदणी करताना अडचण येत असेल , तर ग्रामपंचायत कार्यालय , कृषी सहाय्यक किंवा ग्राम महसूल अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा . ते मार्गदर्शनासाठी नेहमीच तयार असतात .शेतकऱ्यांनो , ही नोंदणी तुमचं पीक सुरक्षित करण्यासाठी, तुमचा आर्थिक हक्क मिळवण्यासाठी आणि तुमचं भवितव्य उजळवण्यासाठी आहे .



बीड : नगर पालिकेचा अंधार दूर होताच खंडोबा दिपमाळ आणि खंडेश्वरी आवारातील येण्या जाण्याच्या रस्त्यावर शहरातील कचऱ्याची घाण टाकून रस्त्याला डम्पिंग ग्राउंड केलेला रस्तावरील घाण उचलून परिसर स्वच्छ करण्याचे काम चालू झाले आहे.

## राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती साजरी

माजलगाव । प्रतिनिधी

**राष्ट्रीय चर्मकार महासंघ युवा संघटनेच्या वतीने लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली.**



या कार्यक्रमास बाजार समितीचे सचिव हरिभाऊ सवणे,जिल्हा परिषद सदस्य रामप्रभू साळुंखे, युवा जिल्हाध्यक्ष राजेश जाधव, तालुकाध्यक्ष सुभाष कांबळे,संभाजी ब्रिगेड तालुका अध्यक्ष तुकाराम नावडकर,जिल्हा सचिव राधाकिसन भाळशंकर,सचिन कांबळे, ॲड.दत्ता जाधव,विजय नरहिरे,बालासाहेब गवळी,राधे भैय्या कासार,शहराध्यक्ष प्रसाद वाघमोडे, संतोष जाधव,मयूर वाघमारे,संतोष खंडागळे,बंडू सोनवणे, भगवानराव सोनवणे, भीमराव गायकवाड,सहदेव खंडागळे,गुड्डु खंडागळे,वसंतराव वाघमारे,अशोक गवळी,अण्णा घोडके, आकाश कांबळे,दीपक सोनवणे,कृष्ण जाधव,प्रकाश सातपुते,गणेश कांबळे,मनोज वाघमारे,अनिल पवार व सर्व समाज बांधव उपस्थित होते.

## घाटनांदुर येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

घाटनांदुर । प्रतिनिधी

येथे साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंतीनिमित्त १ ऑगस्ट शुक्रवार रोजी सकाळी १० वा घाटनांदुर येथील चौक या ठिकाणी आत्ताच साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे व शंकरराव खरात यांच्या साहित्याचा विवेचक अभ्यास यांची पीएच.डी प्रदान केलेली प्रा. नरसिंग उदार यांच्या हस्ते ध्वजारोहण करून साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व श्रीफळ फोडून सर्व महापुरुषांना पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले यावेळी प्रा.नरसिंग उदार,सरपंच महेश गारटे, बीट अंमलदार संभाजी सोळुंके, कमलाकर मिसाळ, पत्रकार परमेश्वर वैद्य, विश्वजीत गंडले, अशोक मस्के,सुरेश ताटे, बालाजी मिसाळ, संतोष ताटे,अच्युत मिसाळ, सुरेश मिसाळ, रवी हजारे,



महेंद्र गोदाम,सुरज लांडगे, बालाजी शिंदे, गोकुळ इचके,सागर मस्के, अमोल शिंदे , बबलू मिसाळ,गोपाळ मिसाळ, व सर्व समाज बांधव,युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## ॲड. आदर्श जाधव यांना २०२५ चा समाज रत्न पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी

न्याय, सत्य आणि सामाजिक बांधिलकीचे भान असलेल्या कार्यकर्त्यांच्या पंक्तीत आपली वेगळी ओळख निर्माण करणारे ॲड. आदर्श अरुणराव जाधव यांना साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्सव समिती तसेच आदर्शमाता कांताबाई बाबुराव मोहिते प्रतिष्ठान, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने २०२५ सालचा ''समाज रत्न पुरस्कार'' जाहीर करण्यात आला आहे.



हा पुरस्कार सामाजिक समता, न्यायहक्क, युवक मार्गदर्शन, वंचितांचे सक्षमीकरण, आणि कायद्यातून सामाजिक परिवर्तन या क्षेत्रातील त्यांच्या सातत्यपूर्ण कार्याची पावती आहे. ॲड. जाधव यांनी आपल्या महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेच्या माध्यमातून व राहुल दुबाले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस परिवार , पोलीस कर्मचारी पोलीस पाल्य यांचा विविध प्रश्नासाठी नेहमी च काम केले व त्या समस्या सोडवल्या तसेच त्यांचा वकिली कार्यातून अनेक गोरगरीब, शोषित, उपेक्षित कुटुंबांना न्याय मिळवून देण्याचे कार्य केले आहे. ॲड.जाधव हे महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना मध्ये राज्य सचिव (लीगल सेल) या पदावर कार्यरत असून महाराष्ट्रभर समाजासाठी,पोलीस परिवारासाठी, काम करत आहेत.या सन्मानाबद्दल ॲड. जाधव म्हणाले, ''हा पुरस्कार माझ्यासाठी सन्मानापेक्षा जबाबदारीची जाणीव करून देणारा आहे. समाजासाठी मी अधिक निष्ठेने कार्यरत राहीन, हेच अभिवादन अण्णाभाऊ साठेंना असेल.'' व समाजा ची सेवा करत राहील. हा माझा प्रथम पुरस्कार मी डॉ.बाबासाहेब आंबेडकर व आई वडील यांना समर्पित करतो. त्यांच्या या यशामुळे मित्र परिवार व सर्व स्तरातून त्यांचे कौतुक होत आहे नव्या पिढीसमोर एक नवा आदर्श उभा करणाऱ्या या कार्यकर्त्याचे मनःपूर्वक अभिनंदन!

## बी.फार्मसी महाविद्यालयात लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती उत्साहात साजरी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचालित बी. फार्मसी महाविद्यालय, अंबाजोगाई येथे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात आणि सामाजिक जाणीवेने साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाचे आयोजन राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने करण्यात आले होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलन आणि लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमापूजनाने झाली. यानंतर विभागप्रमुख प्रा. मंदार चौधरी यांनी उपस्थितांचे स्वागत करत अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनकार्याचा आढावा घेतला.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संतोष तरके यांनी कार्यक्रमाचे औपचारिक उद्घाटन करत लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या संघर्षमय जीवनावर प्रकाश टाकला.



त्यांनी त्यांच्या साहित्यातून व्यक्त झालेली सामाजिक समता, अन्यायाविरोधातील संघर्ष आणि परिवर्तनवादी विचार यावर भाष्य करत विद्यार्थ्यांना सामाजिक बांधिलकीची जाणीव करून दिली.असे कार्यक्रम आयोजित केल्यामुळे विद्यार्थ्यांच्या मध्ये सामाजिक जाणीव निर्माण होते अशी भावना देखील प्राचार्य संतोष तरके यांनी व्यक्त केली.

यानंतर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस पुष्पांजली अर्पण करून उपस्थितांनी त्यांना आदरांजली वाहिली. वक्तृत्व सत्रात प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी 'फकिरा' कादंबरीतील सामाजिक संदेश, त्यांनी स्थापन केलेल्या 'लाल बाणार' नाट्य मंडळीचे कार्य आणि लोकसाहित्याच्या माध्यमातून जनजागृती यावर सखोल विचार मांडले. अण्णाभाऊंच्या कार्यातून प्रेरणा घेण्याचे आवाहनही करण्यात आले. शेवटी प्रा मंदार चौधरी यांनी उपस्तिथानचे आभार मानले. यावेळी बी.फार्मसी महाविद्यालयातील डॉ. गीतांजलि चव्हाण, काव्या रेड्डी, अश्विनी घोळकर, मंजुषा करेप्पा, अमर कावरे, विशाल साखरे, इम्रान सय्यद, मामून कुरेशी, गणेश गिरी , ज्योती मुरकुटे आणि इतर शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

## लोकशाहीर अण्णाभाऊ साठे जयंती पाटोद्यात मोठ्या उत्साहात साजरा

पाटोदा । प्रतिनिधी

लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती निमित्त पाटोद्यात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली जयंती निमित्त पाटोदा शहरात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे पूजन व पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष, उपाध्यक्ष , पदाधिकारी,अनेक मान्यवर आणि समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरलेले रक्तदान शिबिर हे समाजासाठी एक सकारात्मक संदेश देणारे ठरले. या शिबिरात तरुणांनी, महिला–पुरुषांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत समाजसेवेचे अनोखे उदाहरण घडवले. जमा झालेल्या रक्ताच्या पिशव्या भविष्यात गरजू रुग्णांच्या मदतीस धावून जाणार आहेत. हा उपक्रम आरोग्य संवर्धन व सामाजिक उत्तरदायित्वाची जाणीव जागवणारा ठरला कार्यक्रमात युवानेते सागर धस यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवनचरित्रावर सखोल भाष्य करत उपस्थित तरुण वर्गाला प्रेरणा दिली. त्यांनी आपल्या मनोगतात सांगितले की,''अण्णाभाऊ साठे हे केवळ एक साहित्यिक नव्हते, तर ते एक क्रांतिकारी विचारवंत, लोककवी, आणि वंचित समाजाचे समर्थ प्रवक्ते होते. त्यांनी समाजातील विषमता, अन्याय, शोषण यावर लेखणीच्या माध्यमातून प्रहार करत दलित– वंचितांच्या जिव्हाळ्याचा आवाज निर्माण केला. त्यांच्या विचारांवर चालणं हीच खरी त्यांना श्रद्धांजली आहे.'' धस यांनी उपस्थित तरुणांना आवाहन करताना सांगितले की, ''समाज बदलण्यासाठी संघर्ष करण्याची गरज आहे. अण्णाभाऊंच्या जीवनातून प्रेरणा घेत आपण सामाजिक समतेसाठी, शिक्षणासाठी आणि अन्यायाविरुद्ध आवाज उठवण्यासाठी सज्ज झालं पाहिजे.''कार्यक्रमात अनेक मान्यवरांची भाषणे, अनुभव कथन, आणि सामूहिक घोषणांमधून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची महती सांगण्यात आली. संपूर्ण परिसरात उत्सवमय वातावरण होते आणि नागरिकांमध्ये विशेष उत्साह दिसून आला.कार्यक्रमाची सांगता सामूहिक अभिवादन, रक्तदात्यांचा सत्कार व आभार प्रदर्शनाने करण्यात आली.या अभिवादन सोहळा आणि रक्तदान शिबिराच्या माध्यमातून अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याची आठवण तर झालीच, शिवाय समाजसेवेचा एक सशक्त संदेशही पाटोदा परिसरात पोहोचवण्यात आला.

## पान ४ वरुन...

पान ४ वरुन...

### जिल्हाभरात हरित बीड

या अभियानाची एक विशेषता म्हणजे '' एक पेड माँ के नाम '' हा भावनिक आणि सामाजिक संदेश . पर्यावरणाचे रक्षण करताना आपल्या मातेच्या स्मृतीस वंदन करणारा हा संकल्प विद्यार्थी व नागरिकांमध्ये चांगलाच रुजतो आहे . बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी वृक्षारोपण कार्यक्रम यशस्वीरित्या राबविता येईल यासाठी त्यांची सर्व यंत्रणा कार्यान्वित केली आहे . स्वतः त्यांनी पालवन येथील वनविभागाच्या जागेस गुरुवारी भेट दिली . तेथे सुरू असलेल्या खड्डे खोदण्याच्या कामाची पाहणी केली यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी देविदास गाडेकर व त्यांचे सहकारी उपस्थित होते . देविदास गाडेकर यांनी नमूद केले की आम्ही येथे रोपे आणून सात तारखेला वृक्षारोपण करणार आहोत.बीड जिल्ह्याच्या विविध भागांमध्ये हजारो ठिकाणी वृक्ष लागवड कार्यक्रम राबविण्यात येणार असून , त्यासाठी नियोजन , जागा निवड , रोपांची उपलब्धता आणि जनजागृती यावर भर देण्यात आला आहे.हरित बीड अभियान २०२५ हे केवळ वृक्षारोपणापुरते मर्यादित नसून , ते जिल्ह्याच्या दीर्घकालीन हरित विकासाचा पाया ठरणार आहे . पर्यावरण संवर्धनाची ही चळवळ लोकसहभागातून यशस्वी करण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे .

### चोरीस गेलेले अडीच

मंगळसूत्र व सोन्याची चैन असे गुन्ह्यात जप्त करून गुन्हा तपास करून कोर्टात दाखल करण्यात आला होता. आज रोजी सदर गुन्ह्यात जप्त करण्यात आलेली चैन व मनी मंगळसूत्र असे यातील फिर्यादी महिला नामे कमलाबाई मोतीलाल बांगड राहणार परळी यांचा मुलगा नामे मनोज कुमार मोतीलाल बांगड यांना एक चैन रुपये २,५०,०००/ किमतीची २५ग्राम वजनाची परत करण्यात आली आहे. त्यावरून फिर्यादी व त्यांचे कुटुंबीय यांनी पोलिसाच्या कामावर समाधान व्यक्त केले आहे. सदरची कारवाई पो नि. आर के नाचण यांच्या अधिपत्याखाली पोहे गोविंद भताने पोहे घटमळ पो ना/पांचाळ यांनी केली आहे.

### खाटीक समाजाच्या

पाहुणे म्हणून पर्यावरण, वातावरणीय बदल व पशुसंवर्धन खात्याच्या कॅबिनेट मंत्री नामदार पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, मंत्री नामदार संजय सिरसाट, माजी मंत्री तथा आमदार अब्दुल सत्तार, माजी मंत्री अर्जुन खोतकर, माजी मंत्री धनंजय मुंडे, आमदार अतुल सावे, संजय केनेकर यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या मेळाव्यात अनेक महत्त्वाच्या विषयावर चर्चा केली जाणार असून सर्व उपस्थित मान्यवरांचे मार्गदर्शन लाभणार आहे. तरी मुस्लिम खाटीक व कुरेशी समाजबांधवांनी या जिल्हास्तरीय मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन राज्य खाटीक समाजसेवा संस्थेचे महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी, बीड जिल्हाध्यक्ष मुश्ताक कुरेशी, उमापूर येथील सामाजिक कार्यकर्ते जुबेर कुरेशी यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्यांनी केले आहे.

### चौसाळा बस स्थानकाची

गाड्यांचे वेळापत्रक प्रवाशांची सुरक्षितता या सर्व बाबीवर ही तपासणी मोहीम चा अभ्यास केला जातो असे माहिती दिली दिले आहे त्यावेळी तपासणी अधिकाऱ्यांनी सर्वत्र तपासणी करून कौतुक केले आहे तसेच धाराशिव विभागाचे यंत्र अभियंता श्री सूर्यकांत थोरबोले व विभागीय कामगार अधिकारी प्रदीप सुतार या अधिकाऱ्यांचा वाहतूक नियंत्रक विक्रम जाधव यांनी सत्कार केला त्यावेळी उपस्थित पत्रकार बळीराम राऊत खाजा मिया विकास सर्वज्ञ किरण अनभुले आधी उपस्थित होते.

## मातृसंस्थेवर निष्ठा ठेऊन काम करणे गरजेचे –कुलगुरू डॉ. विजय फुलारी

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मातृसंस्थेवर निष्ठा ठेऊन प्रामाणिकपणे आणि सर्मपण भावनेने काम कारणे गरजेचे असते. अशा मंडळींचे सेवानिवृत्तीनंरतचे आयुष्य देखील आनंदात जात असते, असे प्रतिपादन मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांनी केले.डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील दोन जण ३१ जुलै रोजी निवृत्त झाले. यानिमित्त महात्मा फुले सभागृहात गुरुवारी (दि.३१) निरोप समारंभ घेण्यात आला. यावेळी प्रकुलगुरु डॉ. वाल्मिक सरवदे, कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांची उपस्थिती होती. यावेळी प्राणीशास्त्र विभागातील प्राध्यापक डॉ. राम चव्हाण, पात्रता विभागातील वरिष्ठ सहाय्यक उदय जावळे यांना निरोप देण्यात आला. डॉ. राम चव्हाण व मायाताई चव्हाण यांचा स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र देऊन गौरव करण्यात आला. यावेळी मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी म्हणाले, डॉ चव्हाण यांनी अत्यन्त निष्ठेने व इमाने – इतबारे सेवा केली. दिलेली प्रत्येक जबाबदारी अत्यन्त प्रामाणिकपणे सांभाळली. विद्यापीठातील शिक्षक व कर्मचारी दोन्ही वर्गातील पदे



रिक्त होत असल्याने कामाचा बोजा वाढत आहे. तसेच संलग्नित महाविद्यालयांची संख्याही ४८६ पर्यंत पोहोचली आहे. त्यामुळे कंत्राटी शिक्षक भरती करण्यात आली. तसेच मानसेवी तत्वावर काही कर्मचारी एकत्रित वेतनावर नियुक्त करण्यात आल्याचेही ते म्हणाले. सेवानिवृत्तीनंतरच्या वेळ कुटूंबासाठी दिला पाहिजे, असे आवाहनही मा.कुलगुरु यांनी केले. सेवानिवृत्त शिक्षक, कर्मचा–यांचे निवृत्तीवेतन, रजा रोखीकरण निची चार लाख धनादेश या सह सर्व विषय 'पेन्शन सेल'च्या माध्यमातून मार्गी लागतील, असे कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर प्रास्ताविकात म्हणाले. परीक्षा व मूल्यमापन मंडळ संचालक डॉ बी एन डोळे यांनीही मनोगत व्यक्त केले. डॉ.संजय शिंदे यांनी सूत्रसंचालन तर संजय लांब यांनी आभार मानले. यावेळी विविध अधिकार मंडळाचे डॉ रविकिरण सावंत, डॉ. फुलचंद सलामपुरे, डॉ गनी पटेल, डॉ राजेश करपे, डॉ लक्ष्मीकांत शिंदे, डॉ.संजय कवडे आदीसह कर्मचारी, प्राध्यापकांची उपस्थिती होती. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य डॉ.राम चव्हाण म्हणाले, छत्तीस वर्षांपूर्वी याच विद्यापीठात कमवा व शिका योजनेच्या योजनेत काम केलेला विद्यार्थी विद्यापीठात प्राध्यापक होतो. एका नामांकित महाविद्यालयात प्राचार्य पद मिळते. ही सर्व भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या नावाने ओळखलेल्या जाणाऱ्या विद्यापीठाचीच किमया आहे. आमच्या आई वडिलानंतर विद्यापीठ हि मातृसंस्थकुलगुरू डॉ.विजय फुलारी यांनी दिलेली प्रत्येक जबाबदारी प्रामाणिकपणे पार पडण्याचा प्रामाणिक प्रयत्न केला, असेही ते म्हणाले.




# यंदा साखर उत्पादन वाढण्याचा अंदाज

## देशात २०२५-२६ चा साखर हंगाम अनुकूल राहणार

पुणे : देशात २०२५-२६ चा साखर हंगाम अनुकूल आहे. महाराष्ट्र आणि कर्नाटकमध्ये वाढलेली ऊस लागवड आणि केंद्र सरकारकडून वेळेवर वाढ केलेली रास्त आणि किफायतशीर किंमत यामुळे साखरेचे उत्पादन वाढण्याची अपेक्षा आहे. असे मत राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाने व्यक्त केले आहे. आतापर्यंत एकूण साखर उत्पादन २५८.२० लाख टन इतके झाले असून, ते गेल्या वर्षी झालेल्या ३१६.३५ लाख टन उत्पादनाच्या तुलनेत ५८ लाख टन अर्थात १८.३८ टक्क्यांनी कमी झाले आहे.

कर्नाटक आणि तामिळनाडू या राज्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत विशेष गाळप हंगाम चालू राहणार आहे. कर्नाटकातील सात आणि तमिळनाडूतील नऊ कारखाने सप्टेंबरअखेर चालू राहिल्याने देशातील साखर उत्पादन २६१ लाख टनांपर्यंत होईल, असा अंदाज आहे. साखर निर्यात कोटा घोषित झाल्यानंतर एक्स मिल साखरेचा दर प्रतिक्विंटल जवळपास ३ हजार ९०० रुपये राहिला आहे. मात्र, मेच्या मध्यात त्यात घसरण झाली. सणासुदीचा काळ सुरू झाल्याने साखरेची मागणी वाढेल. त्यामुळे किमती स्थिर राहतील, अशी अपेक्षा आहे. दरम्यान पेट्रोलमध्ये इथेनॉल मिश्रणाचे २० टक्क्यांचे उद्दिष्ट भारताने २०३० या निर्धारित कालावधीपेक्षा पाच वर्षे अगोदरच साध्य केले आहे.

देशाने २०१४ मध्ये केवळ १.५ टक्के इथेनॉल मिश्रणावरून १० वर्षांत २० टक्क्यांपर्यंत वाढ केली आहे. देशातील सहकारी साखर क्षेत्रात धोरणात्मक बदल होत आहेत. हे धोरण सहकार क्षेत्राला नवीन ताकद देईल. राज्य सरकारनेही २३ जुलै रोजी राज्यभरात मल्टी-फीड डिस्टिलरीची स्थापना आणि ऑपरेशनला मान्यता दिली. हा निर्णय राष्ट्रीय जैवउर्जा धोरण आणि इथेनॉल मिश्रण कार्यक्रमाशी सुसंगत असल्याने २०३०पर्यंत ३० टक्के मिश्रण आता शक्य होणार आहे.



# या पद्धतीने करा आल्याची लागवड



आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते.

भारतातील जवळजवळ सर्व स्वयंपाकघरांमध्ये आल्याचा वापर स्वयंपाकासाठी केला जातो. आले हे एक महत्त्वाचे औषधी पीक आहे, जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर मानले जाते. आल्यामध्ये कॅल्शियम, मँगनीज, फॉस्फरस, झिंक आणि व्हिटॅमिन सी यासह अनेक औषधी गुणधर्म असतात. आल्याचा उपयोग औषधी म्हणूनही केला जातो. आल्यापासून बनवलेल्या सुक्या आल्याची बाजारात किंमत जास्त आहे. भारतीय बाजारपेठेत आल्याला वर्षभर मागणी असते. त्यामुळे शेतकरी त्याच्या लागवडीतून चांगला नफा मिळवू शकतात. कृषी जागरणच्या या लेखात जाणून घेऊया जास्त उत्पादनासाठी आल्याची लागवड कशी करावी?

योग्य माती आणि हवामान : आले पिकासाठी वालुकामय चिकणमाती माती सर्वोत्तम मानली जाते. या जमिनीत त्याचे पीक चांगले वाढते आणि शेतकऱ्यांना अधिक उत्पादन मिळते. आले लागवडीसाठी मातीची पीएच पातळी ६.० ते ७.५ दरम्यान चांगली मानली जाते. २५ ते ३५ सेल्सिअस तापमान आल्याच्या रोपांसाठी सर्वात योग्य मानले जाते. त्याच्या झाडांना चांगली आर्द्रता आणि योग्य सिंचन आवश्यक आहे. आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्याचे उत्पादन ऑक्टोबर-नोव्हेंबरमध्ये केले जाते.

शेणखताचा वापर : आल्याच्या शेतातून चांगले उत्पादन मिळविण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात शेणखत वापरावे. शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कुजलेले शेणखत, निंबोळी आणि गांडूळ खत घालून ते शेताच्या जमिनीत चांगले मिसळावे. यानंतर, माती समतल करावी. आता शेतकऱ्यांना ते लहान-लहान वाफ्यात विभागून हेक्टरी २ ते ३ क्विंटल बियाणे घेऊन शेतात पेरणी करावी लागते. दक्षिण भारतात, आल्याची पेरणी मार्च-एप्रिलमध्ये केली जाते आणि त्यानंतर सिंचन केले जाते.कमाई लाखात : बियाणे पेरल्यानंतर ८ ते ९ महिन्यांनी पीक पूर्णपणे तयार होते. आल्याचे पीक योग्य प्रकारे पिकल्यावर त्याची वाढ थांबते आणि पिके पिवळी पडून सुकायला लागतात. आल्याची लागवड केल्यास शेतकऱ्यांना हेक्टरी १५० ते २०० क्विंटल उत्पादन मिळू शकते. बाजारात यापैकी एक किलोची किंमत सुमारे ४० रुपये किंवा त्याहून अधिक आहे. त्याची लागवड करून शेतकरी ३.५ ते ४ लाख रुपये सहज कमवू शकतात.

# भुईमूग पिवळा पडण्याची समस्या व उपाययोजना

भुईमूग पिकात पिवळेपणा दिसू लागल्यास तो अनेक कारणांमुळे होऊ शकतो. विशेषतः जर पाऊस सतत होत असेल आणि जमीन चुनखडी (कॅल्सियमयुक्त) असेल, तर पिकाच्या आरोग्यावर त्याचा थेट परिणाम होतो. खाली या समस्येचं विश्लेषण व उपाय दिले आहेत.

समस्या ओळख : पाने पिवळी होणे ही लक्षणे प्रामुख्याने सूक्ष्म अन्नद्रव्यांच्या कमतरतेमुळे (विशेषतः लोह, मॅग्नेशियम, मोलिब्डेनम दिसून येतात.

पाऊस आणि चुनखडी जमिन : सततच्या पावसामुळे मुळांना ऑक्सिजन मिळत नाही. चुनखडी जमिनीत जास्त असल्याने लोह व इतर सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषली जात नाहीत. मुळांच्या कार्यक्षमतेवर परिणाम होतो.

सूक्ष्म अन्नद्रव्ये फवारणी : पाने पिवळी पडल्यास खालील मिश्रणाचा फवारणीद्वारे उपयोग करा.

फेरस सल्फेट ०.५% (५०० ग्रॅम/१०० लिटर पाणी). सायट्रिक ॲसिड ५० ग्रॅम/१०० लिटर पाणी. युरिया १% (१ किलो/१०० लिटर पाणी) (वाढीला चालना देण्यासाठी). हे मिश्रण ७-१० दिवसांच्या अंतराने २ वेळा फवारावे.

पाणी निचरा सुधारणा : सततचा पाऊस असल्यामुळे जमिनीत पाणी साचत असल्यास, पिकामध्ये पाणी साचणार नाही याची दक्षता घ्या. नाली पद्धतीने पाणी वाहून नेण्याची सोय करावी.जमिनीचा पीएच नियंत्रित करणे : जमिनीचा पीएच ७.५ पेक्षा जास्त असल्यास सूक्ष्म अन्नद्रव्ये शोषले जात नाहीत. अशावेळी सेंद्रिय घटक (जसे कंपोस्ट, गांडूळ खत) टाकल्यास जमिनीचा काही प्रमाणात संतुलित होतो. झिंक, फेरस आणि मॅग्नेशियमसारखी सूक्ष्म अन्नद्रव्ये पाने फवारणीने द्यावीत.

जमिनीची तपासणी : एकदा मृदा परीक्षण करून घ्या. त्यामुळे नेमकी कोणती अन्नद्रव्ये कमी आहेत हे समजेल.

जैविक उपाय : रायझोबियम व पीएसबी कल्चर यांचे बीजप्रक्रिया केल्यास मुळांच्या आरोग्यावर चांगला परिणाम होतो. ट्रायकोडर्मा + जीवामृत/जिवाणू खते वापरल्यास मुळांची वाढ सुधारते.

भुईमूग पिकात पिवळेपणा दिसल्यास तो केवळ अन्नद्रव्यांच्या कमतरतेचा नाही, तर जमिनीचा प्रकार, हवामान व पाण्याचा निचरा या सर्व गोष्टींचा मिळून परिणाम असतो. योग्य अन्नद्रव्य फवारणी, निचरा व जैविक उपाययोजना करून आपण भुईमूग पीक निरोगी ठेवू शकतो.



# जनावरांतील अस्थिभंगाची कारणे अन् उपाय



हाडांमध्ये भेग किंवा मोडणे हे अस्थिभंग म्हणून ओळखले जाते. एखादा आघात किंवा ताण पडल्यामुळे हाड पूर्ण किंवा अंशतः मोडते. आघाताचे स्वरूप, दिशा, हाडाची ताण सोसण्याची क्षमता यावर अस्थिभंग अवलंबून असतो. काही विकृतींमुळे अस्थींमध्ये भंग होण्याची विशेष प्रवृत्ती आढळते. हाड हा मुळात कठीण आणि मजबूत पदार्थ आहे. वय, आजार आणि पोषणातील चुन्याच्या अभावामुळे हाड नाजूक आणि ठिसूळ होऊन मोडते. अपघातामध्ये हाडे मोडण्याचा संभव असतो. जनावरांमध्ये पायाचा अस्थिभंग जास्त प्रमाणात दिसतो. जनावरांमध्ये मेटाकार्पस (समोरील पायांतील हाडे), मेटाटारसच्या टिबिया (मागच्या पायांतील हाडे), रेडिअस आणि अल्ना (समोरील पायांतील हाडे) आणि ह्यूमेरसच्या कोपराचे हाड मोडण्याची शक्यता जास्त असते. फरा, मांडी आणि कंबरेचे हाडदेखील बऱ्याच वेळा मोडलेले दिसते. जबडा, पाठीचा कणा, छातीच्या बरगडीच्या हाडांचे मोडणे दिसून येत नाही. लहान वासरू, कोकराची हाडे लवचिक असतात. त्यामुळे ती पूर्ण न मोडता फांदीप्रमाणे केवळ एक बाजूला मोडतात. पूर्ण ताटातूट न झाल्यामुळे तुकडे एकमेकांबरोबर राहतात. असा अस्थिभंग केवळ क्ष-किरणांनी दिसतो. योग्य उपचारामध्ये लवकर जुळून येतो. मोठ्या जनावरांमध्ये हाडे कडक असतात. वाळलेल्या काठीप्रमाणे कडकन तुकडे होतात. काही वेळा त्वचेला जखम न होता अस्थिभंग आतल्या आत राहतो. हाड मोडून वरची त्वचा, मऊ भागांना जखम होते अशा अस्थिभंगास अवघड अस्थिभंग म्हणतात. जखमेत जंतूंचा प्रादुर्भाव होऊन पू, सूज, ताप, जखम मोठी होणे, या समस्या दिसतात.

हाड मोडण्याचे प्रकार : स्थिर अस्थिभंग - हाडाचा कोपरा मोडतो. भेगाळलेला अस्थिभंग - हाडाला आडवी भेग पडते. कमकुवत अस्थिभंग - हाडांचे एकापेक्षा जास्त तुकडे होतात.

अस्थिभंगाची लक्षणे : जनावरांच्या अस्थिभंगाची सर्वसाधारण लक्षणे माणसाप्रमाणेच असतात. श्रोणीफलकाचा अस्थिभंग झाल्यास मोडलेल्या हाडावर भार देऊन जनावर उभे राहू शकत नाही. चेहऱ्याच्या हाडांपैकी कोणत्याही हाडाचा भंग झाला तर अन्न चावणे किंवा रवंथ करणे शक्य होत नाही. लाळ सारखी गळत राहते. दात तुटतात. मणक्याचा अस्थिभंग घोडा आणि श्वानामध्ये अधिक प्रमाणात दिसतो. फऱ्याच्या हाडाजवळ जाड स्नायूंमुळे मोडलेल्या हाडाचे तुकडे एकमेकांपासून फार दूर जात नाहीत, त्यामुळे अस्थिभंग लवकर बरा होतो.

उपचार : पशुवैद्यकाच्या सल्ल्याने आवश्यक क्ष- किरण चाचणीनंतर उपचार करावा. : लहान जनावरांत लांब हाडांच्या पोकळीत जंतुहीन सळई घालून हाड हलू नयेत असा प्रयत्न करतात. विविध उपकरणांचा उपयोग करून हाडे स्थिर ठेवण्यात येतात. हाडांमधील मज्जेमध्ये (लांब हाडांच्या पोकळ भागात आढळणाऱ्या मऊ पदार्थात) खिळ्यासारख्या धातूचा तुकडा घालून हाडे जोडतात. हाड मोडलेल्या ठिकाणी शक्य असल्यास लाकडी फळीचा आधार देऊन बांधावे. अस्थिभंगावर उपचार केल्यानंतरही क्ष किरण चित्र काढून हाड नीट बसले आहे का हे तपासावे. जनावरास योग्य वेदनाशामक गोळ्या नियमित द्याव्यात. कॅल्शिअम, फॉस्फरस आणि जीवनसत्त्व ड युक्त टॉनिक नियमितपणे द्यावे.




### महत्वाच्या घटना

१४९२ : इटालियन खलाशी ख्रिस्तोफर कोलंबस हे आपल्या तीन जहाजांसह स्पेनहून भारताच्या शोधात निघाले.
१७८३ : जपानमधील माउंट असामा ज्वालामुखीचा उद्रेक होऊन सुमारे ३५,००० जण मृत्यूमुखी पडले.
१८११ : जंगफ्राऊ शिखर या बर्नीज आल्प्स पर्वतरांगेतील तिसरे सर्वोच्च शिखराची जोहान रुडॉल्फ आणि हायरोनिमस मेयर यांनी पहिली चढाई केली.
१९०० : 'द फायरस्टोन टायर अँड रबर कंपनी' ची स्थापना झाली.
१९१४ : बव्हेरियाचे राजे लुडविक यांच्याकडे आपणांस सैन्यात दाखल करून घ्यावे असा हिटलरने अर्ज केला आणि त्याची सैन्यात नियुक्तीझाली.
१९३६ : आंतरमहाविद्यालयीन पुरुषोत्तम करंडक ही स्पर्धा आयोजित करणार्या 'महाराष्ट्रीय कलोपासक' या संस्थेची हौशी आणि प्रायोगिक नाट्यसंस्था सुरू झाली. महामहोपाध्याय दत्तो वामन पोतदार या संस्थेचे पहिले अध्यक्ष झाले.
१९४६ : सांताक्लॉज लँड, थीम पार्क जगातील पहिले थीम पार्क सांताक्लॉज, इंडियाना, अमेरिका येथे उघडले.
१९४८ : भारतीय अणूऊर्जा आयोगाची स्थापना झाली.
१९६० : नायजरला (फ्रान्सकडून) स्वातंत्र्य मिळाले.
१९७७ : -८० कॉम्पुटर टँडी कॉर्पोरेशन कपंनीने जगातील पहिल्या मोठ्या प्रमाणात विकलेल्या वैयक्तिक संगणकांची घोषणा केली.
१९८५ : प्रसिद्ध भारतीय समाजसेवक व सक्रीय कार्यकर्ते बाबा आमटे यांना सार्वजनिक सेवेसाठी रॅमन मॅग्सेसे पुरस्कार प्रदान करण्यात आला.
१९९४ : सहज सोप्या व गोड कविता आणि सूक्ष्म व मार्मिक वर्णनात्मक लेख यांद्वारे हिन्दी साहित्याची अमूल्य सेवा करणारे डॉ. हरिवंशराय बच्चन यांना उत्तर प्रदेश सरकारतर्फे विषेश पुरस्कार जाहीर.
१९९४ : संगीतकार अनिल विश्वास यांना मध्य प्रदेश सरकारचा 'लता मंगेशकर पुरस्कार' जाहीर
१९९७ : स्काय टॉवर, ऑकलंड, न्यूझीलंड या दक्षिण गोलार्धातील सर्वात उंच फ्री-स्टँडिंगइमारतीचे उदघाटन.
२००० : मल्याळी दिग्दर्शक शाजी एन. करुण यांना फ्रेन्च सरकारने 'नाईट ऑफ आर्टस अँड लेटर्स' पुरस्काराने सन्मानित केले.
२००४ : राज्यपाल महंमद फझल यांच्या हस्ते सोलापूर विद्यापीठाचे औपचारिक उद्घाटन झाले. १ ऑगस्ट २००४ रोजी या विद्यापीठाची स्थापनाझाली होती.
२००४ : अमेरिकन अंतराळ संस्था नासाने आपला मैसेंजर हा उपग्रह बुध ग्रहाकडे प्रक्षेपित केला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८६ : मैथिलिशरण गुप्त हिन्दी कवी. त्यांचे सुमारे ४० स्वतंत्र ग्रंथ आणि ६ अनुवादित ग्रंथ प्रसिद्ध झाले. त्यांच्या 'भारतभारती' या काव्यग्रंथामुळे त्यांना राष्ट्रकवी म्हणून मान्यता मिळाली. (मृत्यू: १२ डिसेंबर १९६४)
१८९८ : उदयशंकर भट्ट आधुनिक हिंदी नाटककार, एकांकिकाकार, कवी आणि कादंबरीकार. त्यांनी पंजाब विद्यापीठातून'शास्त्री' आणि कलकत्ता विद्यापीठातून 'काव्यतीर्थ' या उपाध्या मिळवल्या. (मृत्यू: २८ फेब्रुवारी १९६६)
१९०० : क्रांतिसिंह नाना पाटील स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक, 'पत्री सरकार'चे (प्रति सरकार) संस्थापक आणि कम्युनिस्ट पक्षाचे खासदार (मृत्यू: ६ डिसेंबर १९७६)
१९१६ : शकील बदायूँनी गीतकार आणि शायर (मृत्यू: २० एप्रिल १९७० मुंबई)
१९२४ : लिऑन युरिस अमेरिकन कादंबरीकार (मृत्यू: २१ जून २००३)
१९३६ : पद्मभूषण व पद्मविभूषण पुरस्कार तसचं, संगीत नाटक अकादमी पुरस्कार सन्मानित सुप्रसिद्ध भारतीय हिंदुस्थानी शास्त्रीय संगीताच्या घराण्यातील शास्त्रीय ठुमरी गायक पंडित छन्नूलाल मिश्रा यांचा जन्मदिन.
१९३७ : फ्रेंच ओपन ग्रँड स्लॅम स्पर्धेचे प्रथम क्रमांकाचे विजेता स्पॅनिश टेनिसपटू आंद्रेस गिमेनो टोलागिरा यांचा जन्मदिन.
१९३९ : भारतीय क्रिकेटपटू अपूर्व सेनगुप्ता यांचा जन्म.
१९५६ : बलविंदरसिंग संधू १९८३ च्या क्रिकेट विश्वचषक विजेत्या संघातील क्रिकेटपटू
१९६० : भारतीय क्रिकेटपटू गोपाल शर्मा यांचा जन्म.
१९८४ : सुनील छेत्री पद्मश्री व अर्जुन पुरस्कार सन्मानित प्रख्यात भारतीय व्यावसायिक फुटबॉलपटू व कर्णधार

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९२ : औद्योगिक क्रांतीच्या काळातील अग्रणी इंग्रज शोधक व उद्योजक रिचर्ड आर्कराईट यांचे निधन.
१९०८ : पटना येथील खुदाबक्श ग्रंथालयाचे संस्थापक मौलवी खुदाबक़्श खान यांचे निधन.
१९२९ : फोनोग्राफ चे शोधक एमिल बर्लिनर यांचे निधन. (जन्म: २० मे १८५१)
१९३० : व्यंकटेश बापूजी केतकर विख्यात गणिती व आंतरराष्ट्रीय ख्यातीचे ज्योतिर्विद (जन्म: १२ जानेवारी १८५४)
१९५७ : देवदास गांधी पत्रकार, 'हिन्दुस्तान टाइम्स'चे संपादक, महात्मा गांधींचे चिरंजीव (जन्म: २ आक्टोबर? १९०० दरबान, दक्षिण अफ्रिका)
१९९३ : स्वामी चिन्मयानंद सरस्वती भारतीय हिंदू अध्यात्म नेते आणि अद्वैत वेदांत, भगवद्गीता, उपनिषद प्रसारक (जन्म: ८ मे १९१६)
१९९३ : उत्तरप्रदेश मधील हिंदुस्तान रिपब्लिकन असोसिएशनचे सक्रीय सदस्य व क्रांतिकारक राम प्रसाद बिस्मिल यांचे निकटवर्तीय प्रेम किशन खन्ना यांचे निधन.
२००७ : सरोजिनी वैद्य लेखिका (जन्म: १५ जून १९३३)
२०२० : जॉन ह्यूम आयरिश राजकारणी नोबेल पुरस्कार (जन्म: १८ जानेवारी १९३७)

## थोडक्यात



### लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांचे विचार प्रेरणादायी– प्रा. भागवत कुरुंद

चौसाळा। प्रतिनिधी

कला व विज्ञान महाविद्यालय चौसाळा येथे लोकशाहीर आण्णा भाऊ साठे यांची जयंती तर लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी १ ऑगस्ट रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या वतीने साजरी करण्यात आली. यावेळी प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. पंडित खाकरे यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ. कुरुंद यांनी आण्णा भाऊंचे समाजा विषयीचे विचार आजच्या विधार्थ्यांना प्रेरणा देणारे असून दिडदिवसाच्या शाळेमध्ये गेलेले अण्णाभाऊ कष्टकार्याच्या व श्रमिकांच्या जीवनाचा अर्थ समजाऊन सांगून कष्टकार्याच्या व्याथीचे वर्णन व समाजाची स्थिती शिक्षणाचे महत्व सविस्तर सांगून लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क असून तो मी मिळवणारच असा नारा दिला व गणेशोत्सव सुरु करून समाजप्रबोधन केले त्यांच्या प्रखर विचारावर प्रकाश टाकला तर प्राचार्य डॉ. खाकरे यांनी तरुणाने युग पुरुशांचे विचार मस्तकात घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. तेलप तर प्रास्ताविक डॉ अलदे व आभार प्रदर्शन प्रा. कोल्हे यांनी केले या वेळी डॉ वणवे, प्रा. ढवळशंख , डॉ. कदम व्यासपीठावर उपस्थित होते.

### कवडगाव ते श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी दिंडी सोहळा

कवडगाव। प्रतिनिधी

वडवणी तालुक्यातील कवडगाव +बु)येथील समस्त भजनी मंडळ व गावकरी यांच्या वतीने गेल्या १४ वर्षापासून एकविसाव्या शतकातील महान विभूती ह भ प वैकुंठवासी किसन बाबा महाराज क्षेत्र गोरक्षनाथ टेकडी यांच्या पुण्यस्मरणानिमित्त पायी दिंडी सोहळा निघतो याही वर्षी हा पायी दिंडी सोहळा दिनांक ७/८/२५ गुरुवाररोजी ग्रामप्रदर्शना करून व बजरंग बली चे दर्शन घेऊन प्रस्थान करणार आहे या दिंडीचा पहिला मुक्काम ताडसोन्ना येथे तर दिंडी दुसऱ्या दिवशी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे होईल. दिनांक ९/८/२५ गुरुवारी रोजी सकाळी ग्रामपंचायत प्रदक्षिणा करून दिंडी सभामंडपामध्ये काल्याचे कीर्तन श्रवण करून दिंडीचा समारोप होईल. दिंडी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त भाविक भक्तांनी सहभागी व्हावे असे समस्त भजनी मंडळ कवडगाव व गावकरी यांनी केले आहे

### नवगण महाविद्यालयात रॅगिंग विरोधी कार्यक्रम

परळी। प्रतिनिधी

नवगण महाविद्यालय, परळी वैजनाथ येथे आज, शनिवार, ०२ ऑगस्ट २०२५ रोजी अँटी रॅगिंग कमितीच्या वतीने ''रॅगिंग समस्या व उपाय या विषयावर एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला प्राचार्य डॉ. बळीराम राख आणि डॉ. लालासाहेब घुमरे यांची उपस्थिती होती.या कार्यक्रमात ॲड. अतिष पोतदार यांनी रॅगिंगच्या समस्येवर सविस्तर मार्गदर्शन केले. त्यांनी रॅगिंगच्या दुष्परिणामांवर प्रकाश टाकला आणि विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी उपायांची माहिती दिली. रॅगिंग ही एक गंभीर समस्या असून, त्यावर कठोर कारवाई करण्याची गरज असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले. तसेच, रॅगिंगविरोधी कायद्यांची माहिती देत विद्यार्थ्यांना रॅगिंगच्या घटना रोखण्यासाठी काय करता येईल, याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी केले. सूत्रसंचालन डॉ. मचाले यांनी तर डॉ पोकळे यांनी आभार आभार मानले. प्राचार्य डॉ. बळीराम राख यांनी विद्यार्थ्यांना रॅगिंगविरोधी संदेश दिला. त्यांनी महाविद्यालयात रॅगिंगमुक्त वातावरण निर्माण करण्याच्या गरजेवर भर दिला आणि विद्यार्थ्यांना यासाठी सहकार्य करण्याचे आवाहन केले. या कार्यक्रमाला विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली होती. अँटी रॅगिंग कमितीने आयोजित केलेल्या या कार्यक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक करण्यात आले.

### श्री संत सोपान काका महाराज मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन

परळी। प्रतिनिधी

येथील श्री संत गुरुवर्य सोपान काका महाराज मंदिरात दिनांक १३ ऑगस्ट पासून अखंड हरिनाम सप्ताह व ज्ञानेश्वरी पारायण सोहळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे तरी सर्व भाविकांनी ज्ञानेश्वरी पारायण व किर्तन भजन मेरू प्रदक्षिणा या धार्मिक कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन श्री संत सोपान काका महाराज उखळीकर फळाच्? वतीने करण्यात आले आहे. श्रीकृष्ण जन्माष्टमी निमित्त १३ ते २० ऑगस्ट या सात दिवस चालणाऱ्या अखंड हरिनाम सप्ताह व ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळ्यानिमित्त दररोज रात्री आठ ते दहा या दरम्यान महाराष्ट्रातील प्रसिद्ध कीर्तनकार यांचे कीर्तन आयोजित करण्यात आले आहे. त्याप्रमाणे दिनांक १३ ऑगस्ट रोजी पहिली कीर्तन सेवा ह भ प. वेदांताचार्य सागर महाराज उखळीकर, १४ ऑगस्ट रोजी ह भ प भागवताचार्य आदिनाथ महाराज फपाळ माजलगाव, १५ ऑगस्ट रोजी ह भ प भागवताचार्य ज्ञानेश्वर महाराज उखळीकर, १६ ऑगस्ट रोजी ह भ प भागवताचार्य मारुती महाराज लातूरकर, १७ ऑगस्ट रोजी ह भ प बापूसाहेब महाराज गोजरे, पैठणकर, १८ ऑगस्ट रोजी ह भ प भागवताचार्य विनायक महाराज शिंदे मानोलीकर, १९ ऑगस्ट रोजी ह भ प भागवताचार्य वासुदेवानंद महाराज टाकळीकर, बुधवार दिनांक २० ऑगस्ट रोजी ह भ प विठ्ठल महाराज उखळीकर यांचे सकाळी दहा ते दुपारी बारा काल्याचे किर्तन होईल व नंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे.

# अण्णाभाऊ साठेंचे साहित्य परिवर्तनाला दिशा देणारे-प्राचार्य डॉ.सरकटे

गढी । प्रतिनिधी

जय भवानी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय शिवाजीनगर गढी येथे साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक पुण्यतिथी महाविद्यालयातील सांस्कृतिक विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने साजरी करण्यात आली.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाचे प्रा. डॉ. रमेश रिंगणे तर अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफे. डॉ. सदाशिव सरकटे हे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला मान्यवरांच्या हस्ते साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे व लोकमान्य टिळक यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. रमेश रिंगणे यांनी असे प्रतिपादन केले की अण्णा भाऊ साठे हे एक थोर समाजसुधारक, लोककवी, लेखक व कादंबरीकार होते.

अण्णा भाऊ साठे यांचे शिक्षण



फारसे झाले नव्हते. तरीही त्यांनी अनेक उत्कृष्ट कादंबऱ्या व कथांचे लेखन केले त्यांना आपण पोवाडे, लावणी रचनाकार व शाहीर म्हणून ओळखतो. फकीरा ही त्यांची खूप गाजलेली कादंबरी आहे या कादंबरीला राज्य शासनाकडून सर्वोत्कृष्ट मराठी कादंबरी म्हणून गोरविण्यात आले आहे त्यांनी तयार केलेल्या कादंबरीवर अनेक चित्रपटही निघाले आहेत.अण्णा भाऊ साठे यांनी तमाशा या लोककलेस लोकनाट्य असा दर्जा प्राप्त करून दिला. त्यांनी आपल्या साहित्यातून सामाजिक विषमता,भारतीय स्वातंत्र्यलढा याविषयी जनजागृती केली. शोषित पीडित व कामगारांच्या हक्कासाठी त्यांनी प्रखर आंदोलने करुन त्यांना हक्क मिळवून दिले. लोकमान्य टिळक यांच्याविषयी बोलताना ते म्हणाले की स्वराज्याची सिंहगर्जना करणारे बाळ गंगाधर टिळक भारतीय इतिहासात नेहमीच अजरामर राहतील.भारताला स्वातंत्र्य मिळवून देण्याच्या कामी त्यांनी विशेष योगदान दिले.टिळक हे नेहमीच आपल्या वृत्तपत्रातून प्रगल्भ वैचारिक मांडणी करत.त्यांनी सर्व भारतीयांसमोर प्रखर राष्ट्रभक्तीचा एक आदर्श ठेवला आहे.अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सदाशिव सरकटे यांनी असे प्रतिपादन केले की अण्णा भाऊंचे लेखन सामाजिक आणि राजकीयदृष्ट्या कृतिशीलतेवर आधारलेले होते.साठे हे मार्क्सवादी-आंबेडकरवादी प्रवृत्तीचे होते, सुरुवातीला त्यांच्यावर साम्यवादी विचारसरणीचा प्रभाव होता.दलित साहित्याचे संस्थापक म्हणून त्यांना श्रेय दिले जाते. संयुक्त महाराष्ट्र चळवळीत देखील त्यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली होती.अण्णा भाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे ठरले आहे. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रोफे.डॉ. राणी जाधव, सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख प्रोफे.डॉ. संतोषकुमार यशवंकुमार तर आभारप्रदर्शन सांस्कृतिक विभागाच्या प्रा. हिरा पोटकुले यांनी केले. यावेळी राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी प्रा. डॉ. जयराम ढवळे, प्रा. श्रीकिसन लोणकर, सांस्कृतिक विभागाचे प्रोफे. डॉ. शिवलाल घुगे यांच्यासह प्रोफे. डॉ. रामहरी फाटक, प्रोफे. डॉ. धर्मराज कटके, प्रा. डॉ. रामदास खताळ, प्रोफे. डॉ. अयोध्या पवळ,प्रा डॉ. तब्बस्सूम इनामदार, प्रा डॉ.महादेवी फड, प्रा. सुप्रिया डोंगरे, प्रा.शिल्पा ससाणे,प्रा. डॉ. कलंदर पठाण, प्रा. अनिल गोंजारे, प्रा. चेतन इंगोले, प्रा. अजित काळे यांच्यासह महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.फ

## महिला कला महाविद्यालय बीडच्या वतीने तळेगाव येथे वृक्षारोपन

बीड। प्रतिनिधी

येथील महिला कला महाविद्यालय,बीड राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने दि.०२/०८/२०२५ रोजी मौजे तळेगाव ता.जि.बीड येथे वृक्षारोपन उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

एक पेड मॉ के नाम आणि वन महोत्सव कार्यक्रमांतर्गत महिला कला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. संध्या आयस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली वृक्षारोपण कार्यक्रम घेण्यात आला. हा कार्यक्रम राष्ट्रीय सेवा योजना विभागाद्वारे घेण्यात आला. या कार्यक्रम प्रसंगी एक दिवस तळेगाव येथे गावकरी आणि महाविद्यालयाच्या शिक्षक, युवक, स्वयंसेवकाकडून खड्डे घेण्यात आले होते, गावकऱ्यांच्या सहकार्यातून एकूण ७० वृक्षांची लागवड तळेगाव येथे करण्यात



आली. त्यामध्ये आवळा जांभूळ, सिताफळ, करंजी ,गुलमोहर ,लिंब अशोक ,पेरू अशा विविध वृक्षांची लागवड करण्यात आली.. या वृक्षारोपण कार्यक्रमाबाबत महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. संध्या आयस्कर आपली भूमिका मांडताना सांगितले की आपण सर्वांनी झाडांची काळजी घेऊन झाडांचे संगोपन करू.

या वृक्षारोपन कार्यक्रमांमध्ये गावकरी, रासेयो स्वयंसेवक, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.बबन बोबडे, डॉ. ज्योती गायकवाड, डॉ.वसुदेव जाधव, मा.अशोक मस्के ( उपसरपंच मौजे तळेगाव) ,मा. उद्धव घोलप, मा. शरद घोलप( ग्रामपंचायत सदस्य) मा.बबन काकडे ( ग्रामपंचायत सदस्य) , ओम घोलप, सरवदे सर या सर्वांनी वृक्षारोपन कार्यक्रमात सहभाग घेऊन मोठ्या उत्साहात वृक्षारोपन कार्यक्रम यशस्वीपणे संपन्न झाला.

## जिल्ह्यात तीन नवीन उपविभागीय पोलीस अधिकारी

### परतूरला रामेश्वर रेंगे तर अंबडला सिद्धेश्वर धुमाळ यांची नियुक्ती

जालना। प्रतिनिधी

जालना जिल्ह्यातील तीन उपविभागीय पोलीस अधिकाऱ्यांच्या बदल्या करण्यात आल्या असून त्यांच्या जागेवर तीन नवीन उपविभागी पोलीस अधिकारी म्हणून लवकरच रुजू होणार आहे. तीन उपविभागीय पोलीस अधिकारी यांची नवीन ठिकाणी नियुक्ती झाली आहे. पोलीस महासंचालक कार्यालयाच्या आदेशानुसार ही खांदेपालट करण्यात आली आहे. जिल्ह्यातील परतूर, भोकरदन आणि अंबड उपविभागात नवीन अधिकाऱ्यांची नेमणूक झाल्याने स्थानिक गुन्हे अन्वेषण आणि कायदा-सुव्यवस्थेच्या बाबतीत नवे धोरण व कार्यपद्धती अपेक्षित आहे.

नवीन नियुक्त अधिकारी व त्यांच्या बदल्या पुढीलप्रमाणे परतूर उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे (सध्या कार्यरतः एटीएस संभाजीनगर) यांची परतूर येथे म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यांच्या अनुभवामुळे परतूर उपविभागातील गुन्हेगारीवर मोठा वचक राहणार आहे. श्री रेंगे यांनी एटीएस विभाग संभाजीनगर येथे त्यांनी धडाकेबाज कारवाई केलेल्या आहे अशी त्यांची ओळख आहे. श्री रेंगे हे लवकरच परतुर उपविभागीय पोलीस अधिकारी विभागाचा चार्ज घेणार आहे अशी माहिती जिल्हा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे. भोकरदन उपविभागीय पोलीस अधिकारी निलंगा (लातूर जिल्हा) येथून उपविभागीय अधिकारी नितीन काटेकर यांची भोकरदन येथे बदली करण्यात आली आहे.

काटेकर हे कठोर, शिस्तप्रिय अधिकारी म्हणून ओळखले जातात. भोकरदन परिसरात सुधारित कायदा-सुव्यवस्था राबवण्याच्या दृष्टिकोनातून त्यांच्याकडून अपेक्षा आहेत.अंबड उपविभागीय पोलीस अधिकारी अंजनगाव (जि. अमरावती) येथील अधिकारी सिद्धेश्वर धुमाळ यांची अंबड उपविभागात नियुक्ती करण्यात आली आहे श्री धुमाळ हे लवकरच पदभार घेणार आहे अशी माहिती जिल्हा पोलीस प्रशासनाकडून देण्यात आली आहे. धुमाळ हे युवापिढीशी संवाद साधणारे, तांत्रिक ज्ञानात पारंगत आणि कायद्याच्या अंमलबजावणीत कठोर अधिकारी मानले जातात. या बदल्यांमुळे जिल्ह्यातील तीनही नवीन विभागीय पोलीस अधिकारी मुळे गुन्हेगारी करणाऱ्या विरुद्ध यांच्यावर मोठी वचक राहणार आहे.

## आदर्श महाविद्यालयात टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती



पिंपळनेर। प्रतिनिधी

आदर्श शिक्षण संस्था बीड संचलित आदर्श महाविद्यालय पिंपळनेर गणपतीचे ता .जि. बीड येथे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी तसेच लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. याप्रसंगी कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून प्रहारचे संपादक अशोक होळकर व बाभुळवाडीचे सामाजिक कार्यकर्ते अमोल सातपुते उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळासाहेब भांडवलकर उपस्थित होते. मान्यवरांनी सर्वप्रथम लोकमान्य टिळक, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमांना पुष्पहार घालून कार्यक्रमाचे प्रतिमा पूजन केले.

यावेळी श्री अशोक होळकर यांनी लोकशाहीर अण्णाभाऊ साठे तसेच लोकमान्य टिळक यांच्या जीवन चरित्रावर मनोगत व्यक्त केले.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ बाळासाहेब भांडवलकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप केला. यावेळी महाविद्यालयात प्रा सतिश नेवडे, श्री अजिज सय्यद, श्री कल्याण सिरसट, श्री बालासाहेब शिंदे, बाबु इतापे, सर्व शिक्षक-शिक्षकेत्तर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## राजर्षी शाहू कन्या विद्यालयात महापुरुषांना अभिवादन

बीड। प्रतिनिधी

श्री छत्रपती राजर्षी शाहू समाज प्रबोधन मंडळ बीड द्वारा संचलित, राजर्षी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालय व राजमाता इंग्लिश स्कूल तेलगाव रोड बीड यांच्या संयुक्त विद्यमाने राजर्षी शाहू कन्या विद्यालयाच्या प्रांगणामध्ये साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे यांची जयंती व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांची पुण्यतिथी साजरी करण्यात आली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष इंजि.बलभिमराव जाहेर पाटील हे होते. तर प्रमुख पाहुणे विद्यालयाच्या मुख्याध्यापिका श्रीम. कदम. एस. डी., प्राथमिकचे मुख्याध्यापक श्री.राऊत आर. टी.राजमाता इंग्लिश स्कूलच्या प्राचार्या श्रीम. आर.डी.लोखंडे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाच्या प्रारंभी साहित्यरत्न लोकशाहीर आण्णाभाऊ साठे व लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांच्या



प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विद्यालयाच्या मुख्याध्यापिका एस.डी. कदम यांनी केले. यावेळी शाळेतील सहशिक्षक के.बी. सोंडगे म्हणाले की,अण्णाभाऊ साठे यांनी बहुजन समाजातील पीडित समस्या यांना आपल्या साहित्यातून केंद्रबिंदू मानून दाहक सामाजिक अवस्थेचे वास्तव चित्रण केले. त्यांच्या अनेक कथा कादंबऱ्याचे देशी- विदेशी भाषांमध्ये अनुवाद झाले. समाज परिवर्तनाचे मोलाचे कार्य त्यांनी केले. असे मनोगत मांडले. तसेच यावेळी अध्यक्षीय भाषणात इंजि. बलभीमराव जाहेर पाटील यांनी स्वराज्य हा माझा जन्मसिद्ध हक्क आहे आणि तो मी मिळवणारच अशी सिंहगर्जना करणारे भारतीय असंतोषाचे जनक, जहालमतवादी, क्रांतिकारक, थोर स्वातंत्र्य सेनानी लोकमान्य बाळ गंगाधर टिळक व साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या कार्याचा गौरव करून मार्गदर्शन केले.

या दोन्ही महापुरूषांच्या जीवन चरित्रा विषयी शाहू कन्या प्राथमिक व माध्यमिक विद्यालयात वक्तृत्व स्पर्धा व शब्दलेखन स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत शाळेतील असंख्य विद्यार्थीनींनी उत्स्फुर्त सहभाग नोंदवला होता. कार्यक्रमाचे सुत्रसंचलन यादव एस.बी. यांनी केले तर आभार श्रीम. वाव्हळकर जे. एस.यांनी मानले. या कार्यक्रमास शिक्षक, शिक्षिका, शिक्षकेत्तर कर्मचारी, व विद्यार्थीनींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# विद्यार्थ्यांनी पुस्तकांच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवावे -बनसोडे

बीड । प्रतिनिधी

जग बदल घालुनी घाव सांगून गेले मज भीमराव'' हया नुसार आपल्या संपूर्ण जीवनाची वाटचाल करणाऱ्या लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंती दिनी महामानव अभिवादन ग्रुपने सुरू केलेल्या तिसऱ्या मोफत शिकवणी वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी व अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतीमेस विनम्र अभिवादन करून कार्यक्रम प्रसंगी अध्यक्षपदी लाभलेले माजी सीईओ जिप पी. व्ही.बनसोडे यांनी जय भीम बुद्ध विहार पूरग्रस्त कॉलनी येथे विद्यार्थी व पालकांशी संबोधितांना उद्गार काढले की शिस्त, बालपणीच्या चांगल्या सवयी व पुस्तकाच्या मैत्रीतून वाचन संस्कृती जोपासून स्पर्धेत यश मिळवता येते.

कार्यक्रमास महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम.भोले यांनी करून प्रास्ताविकात ग्रुपची व पुढील



नियोजनाबद्दल सविस्तर माहिती सांगितली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डी.एम.राऊत यांनी केले. कार्यक्रमास उपप्राचार्य प्रा.डॉ.उत्तमराव साळवे, सेवानिवृत्त उपनिबंधक हनुमंत कांबळे,प्रा.बी.व्ही. काळे,प्रा.श्रीराम जाधव हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. विचार मंचावर प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड, वाचाल तर वाचाल वाचनालयाचे अध्यक्ष डी.जी.वानखेडे, समता सैनिक दलाचे मेजर जनरल कॅप्टन राजाभाऊ आठवले व सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक एलआयसी यु.एस.वाघमारे यांची प्रमुख उपस्थिती होती. सर्वप्रथम महामानवांच्या प्रतीमेस पुष्प व पुष्पहार घालून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मोफत शिकवणी वर्गाचे रवींद्र टेकाळे यांना शिकवणी वर्गाकरिता विद्यार्थ्यांना लागणारे शालेय साहित्य ९६ वह्या व १०० पेन उपस्थित मान्यवरांच्या हस्ते महामानव अभिवादन ग्रुपच्या वतीने देण्यात आले. मुलांची वाचन संस्कृती वाढवण्याकरिता वाचाल तर वाचाल फिरते मोफत वाचनालयाचे डी.जी वानखेडे यांनी ५१ पुस्तकांचा संच ३९ व्या केंद्र असलेल्या, मान्यवरांच्या हस्ते प्रकाश जावळे यांना सुपूर्द केला. या पुस्तकांचे वाचन करून महामानवाचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा ही अपेक्षा व्यक्त केली. प्रमुख पाहुणे प्रा.डॉ.उत्तमराव साळवे यांनी विद्यार्थ्यांना अत्यंत सोप्या भाषेत शिक्षणाचे महत्त्व व पालकांनी घ्यावयाची काळजी अनेक उदाहरणाद्वारे समजावून सांगितली.प्रा. श्रीराम जाधव, बी.व्ही.काळे, प्रशांत वासनीक यांनी साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचे अनमोल विचार समजावून सांगितले.मोफत शिकवणी वर्गाकरिता दानदाते प्रा.डॉ. नामदेव शिनगारे, प्राचार्य सुशीलकुमार गायकवाड प्रा.श्रीराम जाधव, प्रा. बी व्ही काळे व हनुमंत कांबळे यांनी भरघोस अर्थसहाय्य केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन ॲड.तेजस वडमारे यांनी केले कार्यक्रमास, प्रा.अशोक गायकवाड, ए.एल. अवसरमोल, काशिनाथ वाघमारे, इंजि. वसंतराव तरकसे, आर.डी.चक्रे,बी.जी दळवी, एस.एस.सोनवणे, माया ससाने, दादाहरी गायकवाड, असंख्य महिला व उपासक-उपासिकांची उपस्थिती होती. योगेश शिंदे, बप्पा जावळे, प्रकाश जावळे यांनी कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता बहुमोल परिश्रम घेतले. सरनातयणे व विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करून कार्यक्रमाची सांगता झाली.

# जिल्हाभरात हरित बीड अभियान जोरावर !

## उपमुख्यमंत्र्यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी परिसरात होणार वृक्षारोपण

बीड । प्रतिनिधी

**पर्यावरण रक्षण व हरितक्रांतीचा संदेश देणाऱ्या ' हरित बीड अभियानां तर्गत जिल्ह्यातील नागरिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे . येत्या ७ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री व बीडचे पालकमंत्री अजितदादा पवार यांच्या हस्ते खंडेश्वरी देवी मंदिर परिसरात वृक्षारोपण होणार आहे. या अभियानाचा मुख्य उद्देश '' एक दिवसात ३० लाख वृक्षारोपणाचा संकल्प '' असून , या महत्त्वाकांक्षी उपक्रमासाठी जिल्हा प्रशासन , विविध विभाग , शाळा , महाविद्यालये , स्वयंसेवी संस्था आणि नागरिकांचे सक्रिय योगदान अपेक्षित आहे.**





या उपक्रमासाठी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन , जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान , रोजगार हमी योजनेचे उपजिल्हाधिकारी प्रबोदय मुळे , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी आणि अन्य सर्व विभागांचे अधिकारी-कर्मचारी सज्ज आणि कटिबद्ध आहेत . त्यानुषंगाने जिल्हाधिकारी कार्यालयात एक ऑगस्ट रोजी सायंकाळी सर्व विभाग प्रमुख यांची जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी बैठक घेतली . बैठकीस जिल्हा कृषी अधिकारी , सर्व तालुका कृषी अधिकारी, सर्व गटविकास अधिकारी, सर्व मुख्याधिकारी, सर्व तहसीलदार उपस्थित होते. यावेळी बोलताना जिल्हाधिकारी यांनी स्पष्ट केले की बीड जिल्हा हा तसा ओरडवाहू जिल्हा आहे . पावसाचे प्रमाण कमी आहे. जंगलाचे प्रमाण अत्यल्प आहे. अशा परिस्थितीत झाडे लावणे आणि झाडे जगवणे ही प्रत्येकाची प्राथमिक जबाबदारी ठरते . प्रत्येक विभागाने झाडे लागवडीचे नियोजन करावे. रोपे कुठून आणावीत , कशा पद्धतीने ती पोहोच करावीत , रोपे लावण्यासाठी खड्डे करण्याचे नियोजन कसे करावे , तसेच प्रत्येक रोप लावल्यानंतर क्यू आर कोड द्वारे कशाप्रकारे रजिस्ट्रेशन करावे याबाबत त्यांनी सविस्तर सूचना दिल्या . यावेळी मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रेहमान यांनी सर्व गटविकास अधिकारी यांनी ग्राम पातळीवर विस्तार अधिकारी , ग्रामपंचायत अधिकारी यांची नोडल अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे . तसेच पुढील कालावधीत खड्डे खोदणे आणि रोपे पोहोच करणे इत्यादी कामे करून घेणार असल्याचे नमूद केले. ▶▶ पान ३ वर

## दादासाहेब मुंडे काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस तर भागवत तावरे राष्ट्रवादीचे प्रवक्ते

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील उत्कृष्ट वक्ते काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते दादासाहेब मुंडे यांची काँग्रेस पक्षाच्या राज्याच्या प्रदेश सरचिटणीस पदी निवड करण्यात आली त्यासोबतच पत्रकार असलेले भागवत तावरे यांचे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गटाच्या प्रवक्ते पदी निवड करण्यात आली आहे.




सामाजिक चळवळीमध्ये अग्रेसर असलेले व पूर्वाश्रमी चे पत्रकार दादासाहेब मुंडे हे गेल्या काही वर्षापासून काँग्रेस पक्षाच्या जवळ आहेत काँग्रेस पक्षासोबत त्यांचे असलेले संबंध आणि एक युवा कार्यकर्ता म्हणून नुकत्याच राज्यभरातील निवडी प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी जाहीर केल्या यामध्ये दादासाहेब मुंडे यांची काँग्रेस पक्षाच्या प्रदेश सरचिटणीस पदी निवड केली त्यासोबतच दुसरे पूर्वाश्रमीचे पत्रकार भागवत तावरे यांची अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे प्रवक्ते म्हणून नेमणूक करण्यात आली आहे दोन्हीही पत्रकार बांधवांच्या या निवडीबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे दादासाहेब मुंडे यांना निवडीचे पत्र प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी दिले तर भागवत तावरे यांच्या नियुक्तीचे पत्र प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरे यांनी दिले

## चौसाळा बस स्थानकाची स्वच्छता समितीकडून तपासणी



चौसाळा । प्रतिनिधी

येथील बस स्थानकाची स्वच्छता बाबतची तपासणीसाठी ०१ ०८ २०२५ रोजी धाराशिव येथील विभागाचे यंत्र अभियंता श्री सूर्यकांत थोरबोले व विभागीय कामगार अधिकारी प्रदीप सुतार यांच्यामार्फत झाली हिंदुरुदय सम्राट बाळासाहेब ठाकरे स्वच्छता मोहीम अंतर्गत चौसाळा बस स्थानकाची स्वच्छते बद्दल तपासणी करण्यात आली.

या तपासणी मोहिमेअंतर्गत बस स्थानकावरील प्रवासी निवारा अंतर्गत बस स्थानक स्वच्छतागृह प्रवाशांसाठी वेळ पाहण्यासाठी घड्याळ विविध अधिकाऱ्यांचे दूरध्वनी क्रमांक ▶▶ पान ३ वर

## परराज्यातील अनेक तरूणांचे आष्टी तालुक्यात वास्तव

म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**आष्टी तालुक्यात परराज्यातून मोठ्या मजूर स्थायिक झाले आहेत. यातील बहुतांश नागरिक मजूर व जागा भाडे तत्वावर घेऊन वास्तव्य करतात. मात्र काही अपप्रवृत्तीचे नागरिक भाडेतत्वावर राहून गुन्हा करतात आणि निघून जातात.**

प्रमाणावर तरूण, महिला ठेकेदार, मालकाकडून व्यवसायासाठी येतात. ठाण्यातील नोंदीकडे दुर्लक्ष त्यामुळे जागा मालकांनी भाडेकरू ठेवताना सतर्कता बाळगणे आवश्यक आहे. अन्यथा त्यांना नाहक त्रासाला सामोरे जावे लागेल. परराज्यातील लोकांची नोंद पोलिस ठाण्यात करणे बंधनकारक असून अद्याप नागरिकांनी याला फारसा प्रतिसाद दिलेला नाही. ठेकेदार, खोली मालकांकडून वास्तव्यास असलेल्या लोकांची नोंद पोलिस ठाण्यात करणे आवश्यक आहे. आष्टी तालुक्यातील अंभोरा, आष्टी पोलिस ठाणे हद्दीत दुचाकी चोरी, घरफोडी, मोबाईल चोरी, जनावरं चोरीचे प्रकार घडले आहेत. संशयित चोर सापडत नाहीत. तर काही चोर त्यांच्या राज्यात किंवा बाहेरगावी निघून जातात. ज्यावेळी त्यांना अटक होते. त्यावेळी या परिसरात तो भाडेतत्वावर किवा हॉटेल, ढाब्यावर राहत असल्याचे पुढे येते. यासाठी या परिसरातील नागरिकांनी स्वतः पुढाकार घेऊन भाडेकरूची व मजुराची चौकशी करणे आवश्यक आहे. त्याबरोबर आपल्या इमारतीत कोण आणी किती भाडेकरू राहतात त्यांची ओळखपत्राची छायांकित प्रत पोलिस स्टेशनला जमा करणे. याची प्रत्येकाने अंमलबजावणी करणे असे असताना कोणताच व्यावसायिक मालक व ठेकेदार मजुरांची माहिती देण्यासाठी पुढे येत नाही. मजूर अथवा व्यावसायिक ठिकाणी काम करणाऱ्या लोकांची माहिती पोलीस ठाण्यात देण्यास टाळाटाळ करण्याची बीट अंमलदाराच्या माध्यमातून माहिती घेऊन शोध घ्यावा अशी मागणी केली जात आहे.

## चोरीस गेलेले अडीच लाखाचे दागिने परळी पोलिसांनी फिर्यादीस केले सुपूर्द

परळी । प्रतिनिधी

**येथील हलगी गार्डन येथे सुरू असलेल्या शिव कथा दरम्यान गर्दीमध्ये फिर्यादी महिलेच्या गळ्यातील दागिने सोन्याची चैन मंगळसूत्र असा अडीच लाख रुपयांचे मुद्देमाल चोरीस गेला होता या प्रकरणी परळी शहर पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यात पोलिसांनी तपास करून चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करत तो**



**फिर्यादीस सुपूर्द केला**

पोलीस ठाणे परळी येथे हलगे गार्डन या ठिकाणी शिव महाकथेची आयोजन करण्यात आले होते, त्यादरम्यान महाप्रसादाकरिता फिर्यादी महिला व इतर महिला अशा महाप्रसादासाठी असताना त्यांच्या गळ्यातील सोन्याची चैन/ मंगळसूत्र असे चोरी झाली होती, त्यावरून पोलीस ठाणे परळी शहर येथे गुरन १७६/ २४ प्रमाणे दाखल होता, सदर गुण्याचा तपास करून यातील आरोपी महिला यांचा बीड व धाराशिव येथे शोध घेऊन गुन्ह्याततील आरोपी महिला यांना गुन्ह्यात अटक करून चोरलेले मनी ▶▶ पान ३ वर

## माजलगाव तालुक्यात दुचाकी चोरीचे सत्र सुरूच; नागरिक भयभीत

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव तालुक्यात दिवसाढवळ्या दुचाकी चोरीच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ होत असून, त्यामुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. सार्वजनिक ठिकाणी उभ्या केलेल्या दुचाकी गाड्यांवर चोरट्यांचे लक्ष असून, तालुक्यातील विविध भागांतून दुचाकी चोरीच्या अनेक घटना घडत आहेत.

३ दिवसांखाली चोरट्यानी किटीआडगाव,परिसरातील रामेश्वर गायकवाड या युवकाची ४४ १७५६ ही गाडी १२ वाजता खळगे याच्या निवासी शाळेच्या शेजारील शाहापुर आडगाव शीवाजवळील रस्त्यावरील लॉक तोडून दुपारच्या वेळेस दुचाकी चोरी झाल्याची तक्रार ग्रामिण पोलिसांत दाखल केली आहे.

### पोलिसांची कार्यवाही

**पोलिसांनी या चोरीच्या घटनांचा तपास सुरू केला असून, काही ठिकाणी विशेष गस्त वाढविण्यात आली आहे. लवकरच चोरांच्या मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास पोलीस निरीक्षकांनी व्यक्त केला आहे.**

### नागरिकांसाठी सूचना:

आपली दुचाकी नेहमी लॉक करा, शक्य असल्यास वाहनावर अॅलार्म सिस्टीम बसवा, घराबाहेर किंवा दुकानासमोर सीसीटीव्ही बसवावा, संशयास्पद हालचाली दिसल्यास त्वरित पोलिसांशी संपर्क साधावा.

### पोलिसांची कार्यवाही

पोलिसांनी या चोरीच्या घटनांचा तपास सुरू केला असून, काही ठिकाणी विशेष गस्त वाढविण्यात आली आहे. लवकरच चोरांच्या मुसक्या आवळल्या जातील, असा विश्वास पोलीस निरीक्षकांनी व्यक्त केला आहे.

## श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान

माजलगाव । प्रतिनिधी

**येथील सद्गुरू श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थानचे विद्यमान मठाधिपती श्री.ष ब्र.१०८ श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी श्रावणमासानिमित्त श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान सुरू केले आहे. दरम्यान, श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांचे चतुर्थ अनुष्ठान आहे. दरम्यान, माजलगाव मठात रविवार, २४ ऑगस्ट रोजी सांगता होणार असून याप्रसंगी महापूजा आणि तीर्थप्रसादाचे आयोजनही करण्यात आले आहे.**



पवित्र श्रावणमासानिमित्त श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे अनुष्ठान सुरू केले आहे. अध्यात्मिक आणि धार्मिक क्षेत्रात श्रावणमास अनुष्ठानाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शिवैक्य श्रीगुरू तपोरत्नं प्रभूपंडिताराध्य शिवाचार्य महाराज यांनी समस्त जणांच्या कल्याणासाठी दिव्य अनुष्ठान व तपश्चर्या केली, देशातील १२ ज्योतिर्लिंग आणि नेपाळमधील पशुपतीनाथ, हिमालयात अनुष्ठान करून आपले वेगळे स्थान केले. याच विचाराचे संस्कार घेऊन विद्यमान मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज समर्थपणे वारसा चालवित आहेत. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील श्रावणमास अनुष्ठानाचे हे चतुर्थ वर्ष आहे. यावर्षी श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर, जि.नाशिक येथे अनुष्ठान सुरू केले आहे. अनुष्ठानाच्या निमित्ताने श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे श्रीपार्वतीमाता अन्नछत्र (कपिलधार)च्या वतीने अन्नदान सुरू आहे. विजयकुमार मुसळे, मल्लिकार्जुनआप्पा आगरे, महादेव स्वामी हे भाविकांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी अथक परिश्रम घेत आहेत. श्रावणमास अनुष्ठानाची सांगता रविवार, २४ ऑगस्ट २०२५ रोजी श्री मिस्कीन स्वामी मठ संस्थान माजलगाव येथे होणार आहे. त्याअनुषंगाने महापूजा आणि तीर्थप्रसादाचे आयोजन केले आहे. याचा लाभ घ्यावा, असे आवाहन मठाधिपती श्रीगुरू चंद्रशेखर शिवाचार्य महाराज यांनी केले आहे.

## खाटीक समाजाच्या मेळाव्यास उपस्थित रहा : जावेद कुरेशी, मुश्ताक कुरेशी

गेवराई । प्रतिनिधी

राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संस्थेचा भव्य जिल्हास्तरीय मेळावा संस्थेचे संस्थापक अध्यक्ष हाजी अरफात शेख यांच्या मार्गदर्शनाखाली छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) येथील हज हाऊसमध्ये सोमवार, दिनांक ४ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ८ या वेळेत आयोजित करण्यात आला आहे. तरी या मेळाव्यास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राज्य मुस्लिम खाटीक समाज सेवा संस्थेचे राज्य उपाध्यक्ष जावेद भैय्या कुरेशी व बीड जिल्हा अध्यक्ष मुश्ताक कुरेशी यांनी केले आहे.




राज्य मुस्लिम खाटीक समाज सवा संमार्गदर्शनाखाली अध्यक्ष हाजी अरफात शेख यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आलेल्या या मेळाव्यास प्रमुख ▶▶ पान ३ वर

## तलवाड्याच्या सीआयएसएफ जवानाची मुंबईत आत्महत्या

तलवाडा प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथील सीआयएसएफ जवानाने मुंबईतील मुख्यालय बिल्डींगमधील खोलीत दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना दि.२/८/२०२५ सकाळी ७.३० च्या सुमारास उघडकीस आली. या बाबतची माहिती माहीम पोलीस ठाण्याने तलवाडा पोलीसांना कळवली आहे.



**रामनगर येथे होणार अंत्यसंस्कार**

गेवराई तालुक्यातील तलवाडा रामनगर येथील रहिवाशी विष्णू जिजाबा गर्जे यांचा मुलगा अशोक विष्णू गर्जे (वय ३६) हा सीआयएसएफमध्ये नौकरीस असून सध्या तो माहिम। पोलीस ठाणेअंतर्गत सीआयएसएफ ओएनजीसी मुख्यालय मुंबई येथे राहत होता. अशोक गर्जे (वय ३६) यांनी सीआयएसएफ ओएनजीसी मुख्यालयाच्या बिल्डींगमधील खोली क्रमांक २२ मध्ये दोरीने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना घडली आहे. याबाबत माहीम पोलीस ठाणे मुंबई यांनी तलवाडा पोलीसांना कळविले आहे. दरम्यान अशोक गर्जे यांच्या वडिलांना व कुटूंबियांना या घटनेने मोठा धक्का बसला आहे.

## अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे समाजाला दिशा व चालना देणारे - विनायक रत्नपारखी

माजलगाव । प्रतिनिधी

संयुक्त महाराष्ट्र व कामगार चळवळीचा बुलंद आवाज,थोर विचारवंत,समाज सुधारक, साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीच्या निमित्ताने माजलगाव येथे लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे यांनी आयोजित केलेल्या कार्यक्रमात साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करुन अभिवादन केले.



या प्रसंगी भाजपा शहर मंडल अध्यक्ष विनायक रत्नपारखी यांनी अण्णाभाऊ साठे यांचे कार्य सांगताना म्हणाले अण्णाभाऊ साठे यांचे साहित्य हे परिवर्तनाला दिशा व चालना देणारे होते.महाराष्ट्राच्या एकूणच जडणघडणीत आणि परिवर्तनात त्यांचे व त्यांच्या साहित्याचे योगदान महत्त्वपूर्ण मानले जाते.संयुक्त महाराष्ट्र चळवळ लोकमानसात रुजविण्याचे काम अण्णा भाऊ साठे यांनी केले. अण्णाभाऊनी आपले आयुष्य वंचित पीडित शोषित व्यक्तींना न्याय मिळावा म्हणून समाजासाठी संघर्ष करत संपूर्ण जीवन निस्वार्थ भावनेने समर्पित केले.त्यांनी परदेशात देखील आपल्या साहित्यातून कार्य केले व एवढेच नाही तर रयतेचे राजे छत्रपती शिवाजी महाराजांचे कार्य किती महान होते हे आपल्या पोवाडा शाहिरीतून मांडले. गेल्या वर्षीच देवेंद्र फडणवीस यांनी रशियामध्ये त्यांच्या पुतळ्याचे अनावरण केले.त्यांचे कार्य हे देशातच नव्हे तर परदेशात विशेष म्हणजे रशियात देखील मांडले जाते रशियांच्या लोकांना अण्णाभाऊ साठे यांचे कार्य लवकर कळाले पण आपल्या लोकांना आजही अण्णाभाऊ साठेंचे कार्य हे कळाले नाही त्यामुळे यापुढील काळात त्यांचे कार्य कळावे म्हणून त्यांच्या जयंतीनिमित्त त्यांनी केलेले विविध कार्य हे व्याख्याने व निबंध वक्तृत्व स्पर्धा ठेवून त्यांचे विविध कथा कादंबरी पुस्तकाचे समाजामध्ये वाटप करून त्यांचे कार्य सर्वांपर्यंत पोहोचन्यासाठी आपण सर्वांनीच प्रयत्न केले पाहिजेत व आपण अशाप्रकारे जयंतीच्या माध्यमातून उपक्रम घेतले तर त्यांची जयंती खऱ्या अर्थाने साजरी केली असे म्हणायला उचीत ठरेल.गेल्या अनेक वर्षापासून लहुजी विद्रोही सेनेचे संस्थापक अध्यक्ष भास्कर शिंदे हे अण्णाभाऊ साठे यांची जयंती विविध उपक्रम घेऊन जयंती साजरी करतात त्याबद्दल त्यांचे अभिनंदन करून कौतुक केले. या कार्यक्रमाचे प्रसंगी राष्ट्रवादीचे ज्येष्ठ नेते अच्युतराव लाटे, शरद यादव,अजय शिंदे,अजयसिंह राऊत या उपस्थित मान्यवरांनी देखील अण्णाभाऊ साठे यांचे कार्य मांडले. या कार्यक्रमास राम राजे सोळंके,अजय सिंह राऊत,दिनकर शिंदे,शरद कचरे, आनंद कुलकर्णी, संतोष जाधव, नामदेव मुळे,मनोज फरके सह विविध पक्षातील विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

## सभासदांच्या हितासाठीच आम्ही कायम कटिबद्ध- विनोद सामत

### लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या प्रचाराचा उत्साहात शुभारंभ

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

**सभासदांच्या हितासाठी आम्ही कायम कटिबद्ध असून येथून पुढेही ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेची उत्तरोत्तर प्रगती करण्यासाठी प्रयत्न करणार आहोत असे प्रतिपादन वैद्यनाथ को - ऑपरेटिव्ह बँकेचे विद्यमान चेअरमन विनोद सामत यांनी बँक निवडणूक प्रचाराच्या शुभारंभ प्रसंगी बोलताना केले. यावेळी बँकेचे सभासद मतदार मोठ्या संख्येने उपस्थित होते.**



वैद्यनाथ को-ऑपरेटिव्ह बँक संचालक मंडळ २०२५ च्या निवडणुकीत राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री तथा जालना जिल्ह्याच्या पालकमंत्री ना. पंकजाताई मुंडे व आ..धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनल स्थापन करण्यात आले असून पॅनलच्या प्रचाराचा शुभारंभ मोंढा विभागातील श्री संकट मोचन हनुमान मंदिर येथे श्रीफळ वाढवून करण्यात आला. त्यानंतर सर्व उमेदवारांनी गोपीनाथ गड येथे जाऊन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधीचे दर्शन घेऊन प्रसाराला सुरुवात केली. यावेळी बोलताना बँकेचे विद्यमान अध्यक्ष विनोद सामत म्हणाले की वैद्यनाथ बँकेने सर्व सभासदांच्या विश्वासावर आणि सहकार्यावर मोठी प्रगती केली आहे. प्रारंभी लोकनेते गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने यशोशिखर गाठले आहे तर आता राज्याच्या पर्यावरण, हवामान बदल व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँकेने यशाची घोडदौड कायम ठेवली आहे. आगामी काळातही ना. पंकजाताई मुंडे व आ. धनंजय मुंडे यांच्या मार्गदर्शनाखाली बँक प्रगती करीत राहील अशी ग्वाही त्यांनी यावेळी दिली. बँकेच्या सर्वांगीण विकासासाठी आणि सभासदाच्या हितासाठी या निवडणूकीत लोकनेते गोपीनाथराव मुंडे जनसेवा पॅनलच्या सर्व उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने निवडून द्यावे असे आवाहन त्यांनी केले.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामतीतील रेड बर्ड एव्हिएशन अकॅडमीविरुद्ध नागरिकांचा संताप

बारामती । प्रतिनिधी

बारामती येथील रेड बर्ड एव्हिएशन ट्रेनिंग अकॅडमीविरुद्ध स्थानिक नागरिकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. वारंवार घडणारे विमान अपघात, प्रशिक्षणार्थींचे बेजबाबदार वर्तन आणि संस्थेच्या व्यवस्थापनातील ढिसाळपणा यामुळे नागरिकांच्या सुरक्षेला आणि दैनंदिन जीवनाला धोका निर्माण झाला आहे. यासंदर्भात भाजपा युवा मोर्चा पुणे जिल्ह्याचे सरचिटणीस वैभव सोलणकर यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे तक्रार दाखल केली आहे.

गेल्या काही महिन्यांत रेड बर्ड अकॅदमीच्या प्रशिक्षण विमानांचे सातत्याने अपघात घडले आहेत. हे अपघात नागरी वस्त्यांजवळ किंवा शेती परिसरात घडल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. संस्थेकडून अपघातांच्या कारणांबाबत स्पष्टता दाखवली जात नसल्याने नागरिकांचा रोष वाढत आहे. अपुरी देखभाल, प्रशिक्षकांची कमतरता आणि प्रशिक्षणार्थींची अयोग्य तयारी ही या अपघातांची प्रमुख कारणे असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.

रेड बर्ड अकॅडमीतील काही प्रशिक्षणार्थी



पायलट्स सार्वजनिक ठिकाणी उद्धटपणा, वाहतूक नियमांचे उल्लंघन आणि गैरवर्तन करत असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. स्थानिक दुकाने, सार्वजनिक वाहतूक मार्ग आणि परिसरात या विद्यार्थ्यांकडून गोंधळ, ध्वनीप्रदूषण, मद्यपान करून अरेरावी आणि बेदरकारपणे वाहन चालवणे असे प्रकार घडत असल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. यामुळे सामाजिक शिस्त आणि नागरिकांची सुरक्षा धोक्यात आली आहे.

वैभव सोलणकर यांनी केंद्र सरकारकडे देशभरातील पायलट प्रशिक्षण संस्थांसाठी कठोर सुरक्षा नियमावली तयार करण्याची मागणी केली आहे. यामध्ये विमानांची नियमित देखभाल, प्रशिक्षकांची पात्रता, विद्यार्थ्यांच्या वर्तनावर नियंत्रण, स्थानिक प्रशासनाशी समन्वय आणि अपघातांची सखोल चौकशी यासाठी स्वतंत्र विभाग स्थापन करावा, अशी सूचना त्यांनी केली आहे.

### मंत्री मोहोळ यांच्याकडे निवेदन

भाजपा युवा मोर्चाच्या वतीने वैभव सोलणकर यांनी केंद्रीय नागरी उड्डाण मंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे निवेदन सादर करून रेड बर्ड अकॅडमीविरुद्ध तात्काळ चौकशी आणि कठोर कारवाईची मागणी केली आहे. यावेळी युवा मोर्चाचे तालुका अध्यक्ष जगदीश कोळेकर, भाजपा नेते प्रमोद खराडे, शहर अध्यक्ष विवेक साळुंके, युवा नेते संदीप केसकर, हिरामण लोंढे आणि अन्य पदाधिकारी उपस्थित होते.रेड बर्ड अकॅडमीच्या कारभारामुळे बारामतीतील नागरिकांमध्ये असंतोष वाढत असून, याप्रकरणी तात्काळ उपाययोजना होणे अपेक्षित आहे.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई; गंभीर गुन्ह्यातील फरार आरोपीला अखेर अटक



पुणे : बंडगार्डन पोलीस स्टेशनमध्ये दाखल असलेल्या अत्यंत गंभीर स्वरूपाच्या लैंगिक अत्याचाराच्या गुन्ह्यातील तसेच मोक्कातील फरार आरोपीला बंडगार्डन पोलिसांनी अटक केली आहे. तो मागील दोन वर्षापासून फरार होता. विशाल लक्ष्मण भोले (३२, रा. ताडीवाला रोड) याला अखेर पुणे पोलिसांच्या विशेष पथकाने ताब्यात घेत अटक केली आहे.

विशाल भोले याने २०१७ पासून एका महिलेसोबत लग्नाचे आमिष दाखवून तिच्याशी संबंध प्रस्थापित केले. स्वतःचे लग्न झाले नसल्याचे खोटे सांगत वारंवार तिच्यावर इच्छेविरुद्ध जबरदस्ती केली. पिडीत महिला दोनदा गर्भवती राहिल्यानंतर तिची संमती न घेता गर्भपात घडवून आणला गेला.

तसेच, पीडित महिलेने त्याच्यापासून वेगळे राहण्याचा निर्णय घेतल्यावर आरोपीने मारहाण केली, धमकी दिली व जबरदस्तीने संबंध ठेवण्यास भाग पाडले. या प्रकरणी बंडगार्डन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. विशाल भोले याच्या विरोधात यापूर्वीच शिवाजीनगर पोलीस ठाण्यात खून, हत्यार कायदा, महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायदा आणि अत्याचार प्रतिबंधक कायदा अंतर्गतही गंभीर गुन्हे दाखल आहेत. तो या सर्व गुन्ह्यांप्रकरणी फरार होता.

पोलीस उप-आयुक्त मा. श्री. मिलिंद मोहिते यांच्या मार्गदर्शनाखाली तपास पथकाचे अधिकारी स्वप्नील लोहार, अंमलदार ज्ञानेश्वर बडे, मनिष संकपाळ, मनोज भोकरे यांच्या समवेत पथकाने गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करत आरोपीला अटक केली. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस वरिष्ठ पोलीस निरीक्षक रविंद्र गायकवाड, निरीक्षक निलकंठ जगताप, निरीक्षक संपतराव राऊत यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली.

# पुण्यातील एमआयडीसीमध्ये अजितदादांची दादागिरी आहे का? फडणवीसांनी नावं जाहीर करावी; मुख्यमंत्र्यांच्या विधानावर रोहित पवारांचा हल्लाबोल

पुणे । प्रतिनिधी

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुणे हे माहिती तंत्रज्ञान आणि उद्योगनगरी म्हणून ओळखले जाणारे शहर आहे. पुण्यात मोठ्या व नामांकित कंपन्या गुंतवणूक करण्यास उत्सुक आहेत. मात्र, गुंतवणूकदारांवर आमच्या माणसांनाच काम द्या, आम्हालाच कंत्राट द्या, आम्ही सांगू त्या दरानेच काम करा असा दबाव टाकला जातो. ही दबावाची मानसिकता जर थांबवली नाही, तर पुण्याचा विकास साध्य होणे अशक्य आहे. उद्योग क्षेत्रात घुसलेली दादागिरी हा पुण्याच्या विकासातील दुर्दैवाने सर्वांत मोठा अडथळा आहे, असे वक्तव्य केले. यावरून आता राष्ट्रवादी शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर निशाणा साधलाय.



पुण्यातील एमआयडीसीमध्ये अजितदादांची दादागिरी आहे का?

रोहित पवार म्हणाले की, पुण्यातून अनेक कंपन्या जात आहेत. तळेगाव, चाकण या परिसरातील आणि कंपन्या जात आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस जर व्यासपीठावर दादागिरी असे म्हणत असतील तर तुम्ही काय करत आहात? असा प्रश्न निर्माण होतो. पुण्यातील एमआयडीसीमध्ये दादांची दादागिरी आहे का? अजितदादांच्या पक्षाची दादागिरी आहे की भाजपची की एकनाथ शिंदे यांच्या नेत्यांची दादागिरी आहे, हे एकदा स्पष्ट झालं पाहिजे. देवेंद्र फडणवीस यांनी कोण दादागिरी करतं याची नावे लवकरात लवकर जाहीर करावी, असे त्यांनी म्हटले. विकासाचा दर खुंटला आहे. देवेंद्र फडणवीस यांना सगळं माहीत असताना आणि सगळ्या कंपन्या गुजरातला जात असतील, ही भूमिका कदाचित भाजपची असावी, असे देखील रोहित पवार यांनी म्हटले आहे.

सरळ काम तर सगळेच करतात, पण एखादं असं वाकडं करून पुन्हा नियमांत बसवणारं काम जे करतात त्याची माणसं नोंद ठेवतात, असे अजब विधान राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी केले. याबाबत विचारले असता रोहित पवार म्हणाले की, नवीन कृषिमंत्री काय म्हणाले तर वाकडी काम पण सरळ करावी लागतात, त्यांनी महाराष्ट्राचे तिजोरी वेडीवाकडी केली आहे. वाकड्यात काम करण्यासाठी कृषिमंत्रीपद दिलं नाही. सरळ काम करणाऱ्यांच्या मी पाठीशी राहतो, वाकडं काम जर तुमच्या हातून झालं तर तुम्हाला महाराष्ट्र माफ करणार नाही. आम्ही तुम्हाला माफ करणार नाही, असा इशारा त्यांनी दत्तात्रय भरणे यांना दिला.

# शारीरिक कारणं सांगत पत्नीने दिला घटस्फोटाचा अर्ज; न्यायालयाने जोडप्याला दिले पुन्हा संसार थाटण्याचे आदेश

पुणे - पती शारीरिक संबंध ठेवण्यास असमर्थ असल्याचा आरोप करत त्याला सोडून गेलेल्या पत्नीला कौटुंबिक न्यायालयाने मोठा धक्का दिला आहे. पत्नीचा दावा सबळ पुराव्यांअभावी फेटाळत तिला दोन महिन्यांच्या आत पतीच्या घरी परत जाऊन वैवाहिक संबंध पुनर्स्थापित करण्याचा महत्त्वपूर्ण अदेश न्यायाधीश घुले यांनी दिला आहे. केवळ आरोप करणे आणि ते कायदेशीररित्या सिद्ध करणे या दोन भिन्न बाबी असल्याचे न्यायालयाने निकालात स्पष्ट केले आहे. याचिकाकर्ते पतीची बाजू ड. मयूर साळुंके, ॲड. अजिंक्य साळुंके, ॲड. अमोल खोब्रागडे,ॲड. पल्लवी साळुंके यांनी मांडली.




राकेश आणि स्मिता ( नावे बदलली आहेत) यांचा विवाह २०२१ मध्ये झाला होता. मात्र काही काळानंतर स्मिता या पतीचे घर सोडून निघून गेल्या. त्यामुळे राकेश यांनी हिंदू विवाह अधिनियमच्या अंतर्गत वैवाहिक नातेसंबंध पुन्हा प्रस्थापित करण्यासाठी न्यायालयात याचिका दाखल केली. पत्नीने कोणताही सबळ कारणाशिवाय आपला त्याग केला असून, तिला परत नांदायला येण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी केली.पतीच्या याचिकेला उत्तर देताना स्मिता यांनी अत्यंत गंभीर आरोप केले. पती हा संशयी स्वभावाचा असून, तो शारीरिक संबंध ठेवण्यास असमर्थ आहे. लग्नानंतर एकदाही शारीरिक संबंध प्रस्थापित झाले नाहीत आणि पतीचे शरीर संबंधापूर्वीच वीर्यस्खलन होत असे, असेही तिने आपल्या लेखी जबाबात म्हटले.

तसेच पत्नीने दुसर्या न्यायालयात विवाह रद्द करण्यासाठी स्वतंत्र याचिका दाखल केल्याचेही म्हटले. याउलट, पतीने आपल्या याचिकेत आणि पुराव्यात हे सर्व आरोप फेटाळून लावले. आपण शारीरिकदृष्ट्या पूर्णपणे सक्षम असून, मधुचंद्रावेळी आणि त्यानंतरही त्यांच्यात आनंदी शारीरिक संबंध होते, असे पतीने ठामपणे सांगितले. ड. अजिंक्य साळुंके म्हणाले की, हिंदू धर्मशास्त्रानुसार विवाह हा एक पवित्र संस्कार आहे. किरकोळ कारणे किंवा सिद्ध न झालेले आरोप यावरून ही महत्त्वपूर्ण संस्था मोडता कामा नये. पती-पत्नीमधील नातेसंबंध टिकवण्यासाठी दोघांनीही प्रयत्न करणे अपेक्षित आहे. ॲड. मयूर साळुंके म्हणाले की, प्रत्येक लहान-सहान गोष्टीसाठी किंवा सिद्ध न होणाऱ्या आरोपांसाठी न्यायालयीन प्रक्रियेचा वापर टाळावा. जेव्हा एक पक्ष दुसऱ्यावर गंभीर आरोप करतो, जसे की या प्रकरणात पत्नीने पतीच्या शारीरिक क्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण केले, तेव्हा ते आरोप सिद्ध करण्याची जबाबदारी पूर्णपणे आरोप करणाऱ्या पक्षाची असते. न्यायालयाने दोन्ही बाजूंचे म्हणणे तपासले. पत्नीने पतीच्या शारीरिक क्षमतेवर आरोप केला असला तरीही कोणताही वैद्यकीय पुरावा दिला नाही. पत्नीच्या म्हणण्यात विसंगती आहे. एकीकडे शारीरिक संबंध झालेच नाहीत, असे सांगितले जाते. तर दुसरीकडे पतीचे लवकर वीर्यस्खलन व्हायचे असे सांगणे, यातून तिच्या दाव्यावर संशय निर्माण होतो, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले.

# प्रवीण गायकवाडांनी घेतली शरद पवारांची भेट; दिलेला सल्ला ऐकला

**पुणे । प्रतिनिधी**

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांनी आज पुण्यात शरद पवार यांची भेट घेतली. या भेटीनंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला. अक्कलकोट येथील एका कार्यक्रमात प्रवीण गायकवाड यांच्यावर शाईफेक झाल्याची घटना घडली होती. या घटनेचे तीव्र पडसाद ठिकठिकाणी उमटल्याचे पाहायला मिळाले. शरद पवार यांनी गायकवाड यांना काळजी घेण्याचे आणि पोलीस संरक्षण घेण्याचा सल्ला दिला होता. हा सल्ला गायकवाडांनी ऐकला आहे.




माझ्यावर हल्ला झाला यामुळे पोलीस संरक्षण घ्यावं म्हणणं साहेबांच होतं. मला पोलिस संरक्षण मिळालं असल्याचे त्यांनी सांगितलं आहे. यवतमध्ये घडलेल्या घटनेवरही त्यांनी भाष्य केलं. जो संघर्ष निर्माण झाला त्याची माहिती साहेबांना दिली. त्यामुळे सर्वांनी जबाबदारीने सोशल मीडिया वापरले पाहिजे, असं आवाहन गायकवाड यांनी केलं.

गेल्या सहा महिन्यांपासून सामाजिक आणि राजकीय मुद्यावर संभाजी ब्रिगेड एकत्र येण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. हल्ल्याच्या घटनेनंतर हा विषय गतीमान झाला. एकाच विचाराने काम करतो. यापुढे आम्ही एकत्र येणार आहे. मराठा सेवा संघाचा एक भाग म्हणजे संभाजी ब्रिगेड आहे.

मराठा सेवाच्या संघाच्या संस्थापक अध्यक्ष पुरुषोत्तम खेडेकर यांनी निर्णय घेतला आहे की आपण सर्वजण एकत्र येवू, अशी माहिती गायकवाड यांनी दिली. खरंतर ताकद विभागल्यामुळे ना राजकीय यश मिळतंय ना सामाजिक यश म्हणून एकत्र येणार असल्याचे ते म्हणाले. संभाजी ब्रिगेडचा प्रदेशाध्यक्ष मी राहीलच असे नाही, असे देखील प्रवीण गायकवाड यांनी स्पष्ट केलं.

# गायरान जागेच्या वादातून दोन गटांत हाणामारी

**कोरेगाव मूळ: कोरेगाव मूळ (ता. हवेली) येथील मोरे वस्ती परिसरात गायरान जागेच्या वापराबाबत स्थानिक दोन गटात वाद सुरू होता. तो वाद रविवारी (दि. २७ जुलै) अचानक विकोपाला गेला. या वादातून एका २३ वर्षीय महिलेला जातिवाचक शिवीगाळ करून मारहाण झाल्याचा आरोप करण्यात येत आहे. दोन्ही गटांनी एकमेकांविरोधात तक्रारी दाखल केल्याने उरुळी कांचन पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.**



अधिक माहितीनुसार, फिर्यादी महिला आपल्या आई व लहान मुलांसह मोरे वस्ती येथे राहात असून, मजुरी करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करत आहेत. त्यांच्या घराला लागून असलेल्या न्हाणीच्या शेजारी गायरान जागा आहे. रविवारी दुपारी चारच्या सुमारास या मोकळ्या जागेत स्वप्निल पांडुरंग मोरे या युवकाने खड्डा खोदण्यास सुरुवात केली.

महिलेनुसार, खड्डा न्हाणीला लागूनच असल्याने त्यांनी मोरे यांना विरोध केला. आणि तुम्ही इथे खड्डा का खोदता? आम्हाला अंघोळ कशी करता येईल, अशी विचारणा केली. यावर स्वप्निल मोरे याने ही जागा तुमच्या बापाची नाही... तुम्हा लोकांना येथे राहूच द्यायचं नाही, असे म्हणत जातिवाचक शब्द उच्चारले. तसेच महिलेला ढकलून दिले. त्या वेळी मोरेच्या हातातील लोखंडी पहार महिलेला लागली. त्यात ती जखमी झाली.

दरम्यान, वाद सुरू असताना घटनास्थळी फिर्यादी महिलेच्या मदतीसाठी तिचा भाऊ समाधान परशुराम अवचट पोहोचला. त्यालाही शिवीगाळ करत विजय मारुती शिंदे व केतन बाळासो सोनवणे यांनी मारहाण केली. त्याचवेळी स्वप्निल मोरे याने रागाच्या भरात एक वीट उचलून फिर्यादी महिलेला फेकून मारली. ती वीट तिच्या शरीराला लागल्याचेही तक्रारीत नमूद आहे. स्वप्निल मोरे याने दिलेल्या फिर्यादीनुसार, मोरे याला महिला व तिच्या भावाने मारहाणीचा आरोप करण्यात आला आहे.

पोलिसांनी या घटनेत दोन्ही बाजूंच्या तक्रारींचा विचार करून, एकमेकांविरोधात गुन्हे दाखल केले आहेत. त्यात स्वप्निल पांडुरंग मोरे, विजय मारुती शिंदे, केतन बाळासो सोनवणे यांच्यासह फिर्यादी महिला व समाधान परशुराम अवचट यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. या प्रकरणाचा तपास उरुळी कांचन पोलिस करत आहेत. प्रत्यक्षदर्शी, घटनास्थळीचे निरीक्षण, वैद्यकीय अहवाल आणि जातिवाचक टिप्पणीचे स्वरूप यावरून पुढील कारवाई केली जाणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.

# निसर्गरम्य वातावरणात ओतूरच्या विद्यार्थ्यांचा मेळावा

**ओतूर । प्रतिनिधी**

**येथील अण्णासाहेब वाघिरे महाविद्यालयातील वयाची पन्नाशी पार केलेल्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा जुन्नरजवळील लेण्याद्रीच्या पायथ्याशी असलेल्या निसर्गरम्य परिसरातील पर्यटन केंद्रात मोठ्या उत्साहात पार पडल्याची माहिती संजय येंधे व किसन नलावडे यांनी दिली.**



श्री गणेश पूजन व राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मेळाव्यानिमित्त तब्बल ३७ वर्षांपूर्वीचे ४० सवंगडी एकत्र जमले होते. प्रास्ताविकात अनिल बोडके यांनी सर्वांचे स्वागत करून दिवंगत मित्र मैत्रिणींना श्रद्धांजली अर्पण केली. त्यानंतर सर्वांनी आपापला परिचय दिला. त्यानंतर झालेल्या गप्पा गोष्टींमधून शालेय व महाविद्यालयीन काळातील जुन्या आठवणींना उजाळा मिळाला. शालेय जीवनातील अनुभव मांडताना क्षणोक्षणी हास्याचे फवारे उडत होते. दुपारच्या सत्रात विविध गुणदर्शनात रुकसाना जमादार व पांडुरंग गवांदे यांनी सुरेल आवाजात अभंग सादर केले, तर नीता वाघ, संजय रसाळे, बापू रसाळे यांनी जुन्या नव्या बहारदार सिनेमा गीतांचे सादरीकरण करून उपस्थितांचे मनोरंजन केले. महिला वर्गाने विविध खेळ खेळून व फुगडीसह फोटोग्राफीचा मनसोक्त आनंद घेतला. सैराट या गाण्यावर तर सर्वजण थिरकले.

याप्रसंगी सहाय्यक पोलिस निरीक्षक सुनील नलावडे, उद्योजक जालिंदर पानसरे यांचा सन्मान करण्यात आला. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी अशोक वाघ, सतीश ढमाले, शेखर जगदाळे, विजय वायकर, शांताराम नलावडे, बापू हैलकर, मच्छिंद्र वायकर, अशोक औटी, वंदना पानसरे, सुलभा डुंबरे, कमल मोरे, लतिका घोलप आदींनी परिश्रम घेतले. बापू रसाळे यांनी सूत्रसंचालन केले. अनिल बोडके यांनी आभार मानले. वंदे मातरम या ध्वज गीताने कार्यक्रमाची सांगता झाली.

# डीपी प्लॅन संदर्भात महत्त्वपूर्ण बैठक

देहूगाव । प्रतिनिधी

नगरपंचायतीच्या विकास आराखड्याच्या (डीपी प्लॅन) अनुषंगाने नगरपंचायत कार्यालयात महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. प्रशस्त रस्ते, उद्यान, वाहनतळ, विश्रामगृह, रुग्णालय आदी पायाभूत सुविधा उभारण्याच्या दृष्टीने या बैठकीत सविस्तर चर्चा झाली. यामध्ये विकास कामांसाठी लागणाऱ्या जमिनी, शासकीय गायरान भूखंडांचा वापर, आणि रेड झोनसारख्या अडचणींचा आढावा घेण्यात आला.



देहू गाव ग्रामपंचायतीचे ८ डिसेंबर २०२० रोजी नगरपंचायतीत रूपांतर झाले. तेव्हापासून लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे अनधिकृत बांधकामे आणि नियोजनशून्य वसाहती वाढल्याने सार्वजनिक सुविधांच्या पुरवठ्यात अडचणी निर्माण झाल्या आहेत. विकास आराखड्याच्या माध्यमातून पुढील वर्षभरात डीपी प्लॅन तयार केला जाणार असून, त्यामध्ये एसटीपी प्लांट, प्रशस्त जलकेंद्र, वाहनतळ, रुग्णालय, ग्रंथालय, विश्रामगृह, विद्युत उपकेंद्र, नगरपंचायतीची प्रशस्त इमारत आदी सुविधा उभारण्याचा समावेश आहे. मात्र, अनेक जमिनी रेड झोनमध्ये येत असल्याने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या जमिनी न घेता शासकीय गायरान जमिनीचा वापर करण्याचा पर्याय चर्चेला आला.

तसेच, नागरिकांच्या जमिनींवर जर आरक्षण लागणार असेल, तर त्यांना योग्य मोबदला अथवा टीडीआर देण्याची मागणीही बैठकीत झाली. विकास कामांना गती देण्यासाठी रस्ते व वसाहतींसाठी योग्य नियोजन करून लवकरात लवकर डीपी प्लॅन तयार करण्यात येणार आहे, अशी माहिती बैठकीतून देण्यात आली. या बैठकीत नगर रचनेचे सहाय्यक संचालक अभिजीत केतकर, नगर रचना विभागाचे मंगेश देशपांडे, सहाय्यक प्रतीक भांगे, अधिकारी सुरेंद्र आंधळे, देहू नगरपंचायतीचे मुख्याधिकारी चेतन कोंडे, नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका आणि संत तुकाराम महाराज संस्थानचे विश्वस्त आदी उपस्थित होते.